शनिवार, ४ मे २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २४६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 4 MAY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-246 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

चर्चेतील बातमी

## तीन आरटीओ अधिकाऱ्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** चोरीच्या ट्रकची बनावट कागदपत्रांद्वारे नोंदणी व विक्रीप्रकरणी अमरावती येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) तीन अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोन महिन्यांच्या सखोल तपासानंतर हा गैरकारभार उघड करून एकूण ९ जणांना अटक केली आहे.
विविध राज्यांतून चोरण्यात आलेले ट्रक, ट्रेलरच्या चेसिस व इंजिन क्रमांकात फेरबदल करून व त्यांची परराज्यात नोंदणी करून विक्री केली जात होती. या कारवाईत गुन्हे शाखेने एकूण ५ कोटी ५० लाख रुपये किमतीची २९ वाहने जप्त केली आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहायक परिवहन अधिकारी भाग्यश्री पाटील (४३), मोटार निरीक्षक गणेश वरूठे (३५) आणि सहायक मोटार निरीक्षक सिद्धार्थ ठोके (३५) अशी अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. नोंदणीसाठी आलेल्या वाहनांची प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदी घोडे नाचवून चोरीच्या वाहनांची नोंदणी करणे या अधिकाऱ्यांना भोवले. आरोपी वाहनांच्या चेसिस व इंजिन क्रमांकात फेरबदल करून त्यांची अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, मणिपूर, नागालँड या राज्यात नोंदणी करत होते.

# दोन दिवस उष्णतेची लाट

## रात्री उकाड्याचा, उष्ण - दमट हवामानाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. देशातील बहुतांश ठिकाणी उष्णता वाढली आहे. तापमानाचा पारा वाढल्यामुळे नागरिकांची काहीली होत आहे. दरम्यान, हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील 5 दिवसांत महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये 5 मेपर्यंत मध्य भारतात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर रात्रीही उकाड्याचा आणि उष्ण दमट हवामानाचा इशारा दिला आहे.**



गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल, पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे 3 मे पर्यंत कमाल तापमान 44 ते 47C च्या आसपास राहण्याची आणि त्यानंतर कमी होण्याची शक्यता आहे. गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी; ओडिशा, बिहारचा काही भाग; आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, झारखंडच्या तुरळक भागात उष्णतेच्या लाटेची किंवा उष्णतेच्या तीव्र लाटेची परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यानंतरच्या 3 दिवसांत या प्रदेशातील तुरळक भागात उष्णतेच्या लाटेच्या स्थितीसह तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे. पुढील 3 दिवसात रायलसीमाच्या तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेच्या लाटेची स्थिती आणि त्यानंतरच्या 2 दिवसांत उष्णतेच्या लाटेची परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. पुढील 4 ते 5 दिवसांत तेलंगणा, कर्नाटकातील मध्यवर्ती भाग, किनारी आंध्र प्रदेश आणि याणम मधील तुरळक भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तामिळनाडू मधील तुरळक भागात उष्णतेच्या लाटेची दाट शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, गुजरात राज्यातील तुरळक भागात 5 मे पर्यंत आणि मराठवाड्यातील तुरळक भागात 3 ते 5 मे दरम्यान उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. पुढील 5 दिवस कर्नाटक आणि केरळ आणि माहे किनारपट्टीसह पश्चिम आसाममध्ये उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. छत्तीसगडमध्येही उष्णतेच्या लाटेचा इशारा आहे. तर 3 ते 5 मे दरम्यान मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात 1 आणि 2 मे 2024 रोजी ओडिशा आणि गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगालमध्ये रात्री उकाड्याची शक्यता आहे. दरम्यान, या वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आले आहे.

# पिकविणारा टिकला नाहीतर खाणाऱ्याला खायलासुद्धा मिळणार नाही

## शरद पवार : निरेच्या सभेतून मांडली शेतकऱ्यांची व्यथा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आज हा देश ७० टक्के लोकांच्या कष्टाने चालतो आणि ते सत्तर टक्के लोक म्हणजे काळ्या आईशी इमान राखणारा शेतकरी आहे.आज ह्या शेतकऱ्यांची स्थिती ह्या सरकारने अवघड करून ठेवली. संपुर्ण देशात कर्जबाजारी पणा निर्माण झाला आहे. थकबाकीदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली. हे सगळं घडतय.याचं महत्वाचं कारण आपल्या मालाची किंमत सध्याच्या राज्यामध्ये चांगली दिली जात नाही. त्याच्याबद्दल अनेक वेळा चर्चा केली जाते.पार्लमेंटमध्ये चर्चा करत असतो.खाजगीमध्ये चर्चा करतो. आम्हांला सांगण्यात येतं.तुम्ही त्यांचे प्रतिनिधी आहात. आम्ही खाणाऱ्यांचे प्रतिनिधी आहोत. आमचं सांगने त्यांना एवढेच आहे की खाणाऱ्याला धान्य किंवा शेतीमाल स्वस्त मिळावा ही तुमची



भूमिका समजू शकतो.जर पिकविणारा टिकला नाहीतर खाणाऱ्याला खायला सुध्दा मिळणार नाही, असे प्रतिपादन माजी केंद्रिय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले. ते निरा, ता.पुरंदर येथे बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवार सुप्रियाताई सुळे यांच्या प्राचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेतून बोलत होते. यावेळी मंचावर खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार वंदनाताई चव्हाण, आमदार संजय जगताप, रोहित पाटील, नितेश कराळे गुरूजी, सक्षणा सलगर, डॉ.नितीन सावंत, माजी आमदार शेवाळे बापू, संभाजीराव झेंडे, माणिकराव झेंडे, सुदामआप्पा इंगळे, दत्ताआबा चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते. शरद पवार पुढे म्हणाले की, जो पिकवितो तो कधी टिकू शकत नाही. मोदी साहेबांचे हे धोरण आहे. पिकविणारांचं महत्त्व नाही. खाणाऱ्यांचे महत्व आहे. आता काहीतरी बदल करावे लागेल. राज्य हे शेतकऱ्यांच्या हिताची भूमिका घेणारे अशा घटकांच्या हातात दिले पाहिजे आणि ते काम हे उद्याच्या निवडणुकीच्या,मतदानाच्या रूपाने केलं पाहिजे.या देशाचा सत्तर टक्के वर्ग जो शेती करतो,त्याला त्याच्या कामाची व कष्टाची किंमत देण्याची आजच्या राज्यकर्त्यांची तयारी नाही.या सत्तर टक्के लोकांना न्याय द्यायचा असेल तर ह्या सत्तर टक्के लोकांचा मताचा जो अधिकार आहे.तो आम्हांला न्याय देत नाही. त्यांना न्याय देणं हे तुमंच आमचं कर्तव्य आहे. त्यासाठी ह्या निवडणूका महत्वाच्या आहेत. त्या दृष्टीने आपल्या सगळ्यांना विचार आजची गरज आहे. सुप्रियाताई सुळे यांच्या कार्यपध्दतीबद्दल लोकांना सांगत असताना शरद पवार म्हणाले की,तीनवेळा तुम्ही सुप्रियाला निवडून दिलं.देशामध्ये ५४४ खासदार असतात.त्या ५४४ खासदारांच्यात सगळ्यात जास्त हजेरी,सगळ्यात जास्त प्रश्न, सगळ्यात जास्त काम हे करणाऱ्यांची यादी ज्या वेळी पार्लमेंट लोकांची झाली. त्या ५४४ मध्ये तुमच्या खासदाराचा नंबर दुसरा लागला.जे काम करतात त्यांना प्रोत्साहित करणं ही जबाबदारी आपली आहे.ते काम तुम्ही करा. बाकीचे जे प्रश्न आहेत,मग तर शेतीचे असतील, कारखान्याचे असतील ही निवडणूक प्रक्रिया पार पडला की त्या कामात आपण लक्ष घालून त्यातून मार्ग काढू, असा विश्वास सुद्धा शरद पवार यांनी व्यक्त केला.यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे,आमदार संजय जगताप, रोहित पाटील, नितेश कराळे गुरुजी, सक्षना सलगर, दत्ताआबा चव्हाण,कल्याणतात्या जेधे, अमोल साबळे, महेश आदींसह इतरांनी मनोगते व्यक्त केली.

## मोदींच्या टीकेला रोहित पवारांचे प्रत्युत्तर


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जो या वयात स्वतःचे कुटुंब सांभाळू शकत नाही, तो महाराष्ट्र काय सांभाळेल, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्यावर केली होती. या टीकेनंतर आता शरद पवार गटाकडून पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करण्यात येत आहे. या टीकेला शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनीही प्रत्युत्तर दिलं आहे. एक्स या समाज माधमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीव्ही ९ नेटवर्कला मुलाखत दिली होती. यावेळी बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील विविध मुद्द्यावर भाष्य केले. यावेळी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीबाबत विचारण्यात आले असता, जो स्वतःचं कुटुंब सांभाळू शकत नाही, तो महाराष्ट्र काय सांभाळेल, अशी टीका त्यांनी शरद पवार यांच्यावर केली. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट हा राजकीय विषय नाही. शरद पवार यांनी याला कितीही राजकीय विषय बनवायचा प्रयत्न केला, तरी महाराष्ट्रातील जनतेला हे मान्य होणार नाही. हा पूर्णपणे त्यांच्या कुटुंबाचा विषय आहे.

# हिंमत असेल तर काँग्रेसच्या जाहीरनाम्याला पाठिंबा जाहीर करा!


## रत्नागिरी येथील सभेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज




रत्नागिरी : हिंमत असेल तर अयोध्येत राम मंदिर बांधले गेले ही चांगली गोष्ट झाल्याची जाहीर कबुली द्या, असे आव्हान देत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी रत्नागिरी येथे झालेल्या जाहीर सभेत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. वीर सावरकरांचे नाव भाषणात घेण्याची हिंमत नकली सेनेचे अध्यक्ष उद्धव ठाकरे दाखवू शकत नसतील, तर नकली शिवसेनादेखील त्यांनी चालवू नये, असा टोलाही श्री. शाह यांनी लगावला. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचारार्थ रत्नागिरी येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, उद्योग मंत्री उदय सामंत ,शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आ.नितेश राणे, आ.शेखर निकम, किरण सामंत, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आदी यावेळी उपस्थित होते.
शाह म्हणाले की, तिहेरी तलाक, कलम 370 पुन्हा लागू करण्याच्या काँग्रेसच्या जाहीरनाम्याशी सहमत आहात का, हेही उद्धव ठाकरेंनी जाहीर करावे. काँग्रेसची वोट बँक हीच उद्धव ठाकरेंची वोट बँक आहे हे माहीत असल्याने अशी कबुली देण्याची हिंमत ते दाखविणार नाहीत. तिहेरी तलाक पुन्हा लागू करण्याचे आश्वासन देणाऱ्या, 370 कलम पुन्हा लागू करण्याची ग्वाही देणाऱ्या, मुस्लिम पर्सनल पुन्हा लॉ लागू करण्याचे आश्वासन देणारा काँग्रेसचा जाहीरनामा मान्य आहे की नाही, हे जाहीर करा, मौन पाळू नका, महाराष्ट्राच्या जनतेसमोर याची उत्तरे तुम्हाला द्यावीच लागतील. बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा असा सहज मिळत नसतो, तुम्ही केवळ त्यांच्या पोटी जन्म घेतला, पण वारसा मात्र नारायण राणे, एकनाथ शिंदे, राज ठाकरे चालवत आहेत. तुम्ही त्या वारशाचा केव्हाच त्याग केलात, अशा शब्दांत श्री.शाह उद्धव ठाकरे यांच्यावर अक्षरशः बरसले. इंडी आघाडी ही एक प्रकारे औरंगजेब फॅन क्लब झाली आहे, त्यामुळे या फॅन क्लबसोबत जायचे, की मोदीजींसोबत राहायचे याचा निर्णय रत्नागिरीकरांनी करायला हवा, असे आवाहनही शाह यांनी केले.
नारायण राणे यांच्यासाठी दिलेले एक-एक मत मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविणारे व देशाला समृद्ध करणारे ठरणार आहे. देशाची अर्थव्यवस्था 11 व्या क्रमांकावर सोडून काँग्रेसचे पंतप्रधान मनमोहन सिंग पायउतार झाले. मोदीजींनी देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणली. मोदीजींना प्रधानमंत्री बनविणे म्हणजे देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणणे, देशाच्या सुरक्षिततेची हमी मिळविणे आहे. मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा, देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणणार ही मोदीजींची गॅरंटी आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.
उद्धव ठाकरे ज्यांच्या बरोबर जाऊन बसले आहेत, त्या सोनिया गांधी, शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांनी 70 वर्षांपासून अनाथ अपत्यासारखे 370 कलमास कवटाळले होते. 370 कलम रद्द केल्यास काश्मीरमध्ये रक्ताचे पाट वाहतील असे राहुल गांधी म्हणाले होते. पाच वर्षे झाली. काश्मीरमध्ये रक्ताचा एक थेंबही सांडलेला नाही. मुख्यमंत्री बनण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी ज्यांच्या पायाशी लोळण घेतली ते काँग्रेस व शरद पवार कलम 370 रद्द करण्यास विरोध करत होते. तुम्हाला मुख्यमंत्रीपद पाहिजे की, कलम 370 ची पाठराखण करणारी काँग्रेस व शरद पवारांची एनसीपी पाहिजे याचे उत्तर नकली सेनेचे अध्यक्ष उद्धव ठाकरेंनी दिले पाहिजे, असेही शाह म्हणाले. जे शरद पवार आणि राहुल गांधींसमोर लोटांगण घालतात, ते महाराष्ट्राचा सन्मान सांभाळू शकत नाहीत, असा टोलाही त्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.
सोनिया-मनमोहन सरकारच्या काळात पाकिस्तानातून दहशतवादी येऊन बॉम्बस्फोट करून जात होते, तेव्हा काँग्रेसची वोट बँक सांभाळण्यासाठी मौनीबाबा मनमोहन सिंग दिल्लीत मौन धारण करून बसत होते. दहशतवाद्यांनी हल्ला केल्यावर दहा दिवसांतच मोदीजींनी पाकिस्तानात घुसून आतंकवादाचा नायनाट केला. छत्तीसगढमध्ये नक्षल्यांचा सफाया झाला, 29 नक्षलवादी ठार झाले, तेव्हा राहुल गांधी त्यांच्या बचावासाठी पुढे आले. ज्यांनी शेकडो निरपराधांचा जीव घेतला, त्यांचा बचाव करणाऱ्या राहुल गांधींसमोर उद्धव ठाकरे लोटांगण घालतात, ही शरमेची बाब आहे, असेही ते म्हणाले.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932





आधुनिक केसरी

कुतूहल हा ज्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे, अशा लहानग्यांचं कुतूहल शमवणाऱ्या कितीशा शाळा आहेत ? बऱ्याच शाळांमध्ये कुतूहल, नैसर्गिक प्रेरणा, भावना दमन करण्याचेच काम शिक्षण देण्याच्या नावाखाली केले जाते.
आपण स्वतःला आणि इतरांना बंदिस्त करण्यात पटाईत आहोत. चैतन्यरुपी परमेश्वर चराचरात भरून राहिला आहे. त्याला आपण मंदिर, मशीद, चर्च इ. त बंदिस्त केले. त्याच्या अनंतरूपाचा अनुभव आपण घेतो आणि देतो कुठे ? चराचराला प्रकाश देणाऱ्या सूर्यदेवांना आपण खोलीत बंदिस्त केलं. वाहत्या पाण्याला स्विमिंग पूल, आणि बाथरूममधील नळात बंदिस्त केलं, त्यात धन्यता मानू लागलो. जीवन हाच एक मोठा चित्रपट आहे. त्याचा अनुभव आम्ही थिएटर, टीव्ही आणि मोबाईलमध्ये घ्यायला लागलो. आमच्या जाणिवा विशाल होण्याऐवजी संकुचित करायला लागलो.
पुण्यामध्ये उन्हाळी सुटीमध्ये मुलांसाठी शिबिरे घेणारे, मुलांना काहीतरी नवीन शिकवण्याचा प्रयत्न करणारे मयुरेशजी डंके यांचा एक लेख नुकताच वाचनात आला. मयुरेशजी मुलांना गडकिल्ले दाखवायला घेऊन जातात. भोवतालच्या निसर्गाची आणि पर्यावरणाची माहिती करून देतात. त्यांच्या ' अनुभूती ' या शिबिरात अनेक पालक निरनिराळ्या कारणांसाठी आपल्या मुलांना पाठवतात. पण त्यांच्या आपल्या मुलांसाठीच्या इतक्या अपेक्षा असतात की त्याचा विचार केला तर मुलं नवीन गोष्टी कशा काय शिकू शकतील हा प्रश्नच आहे !



## हितगुज

पुष्प ५४वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### ओम नमो मार्तंड भैरवाय

श्री कार्तिकेयाच्या नेतृत्वाखाली सात कोटी (येळकोट) गणांचे सैन्य देऊन शिवाने या दैत्यांशी तुंबळ युद्ध केले. मणीने मृत्यूसमयी भगवान शिवाकडे वर मागितला की, 'माझे शिर नित्य तुझ्या पायाखाली असू दे व माझे अश्वारूढ रूपही तुझ्या सान्निध्यात राहू दे.' मल्ल दैत्याने भगवान शिवाकडे वरयाचना करून देवाच्या नावांत आधी आपले नाव असण्याची विनंती केली. भोळ्या शिवाने दोन्ही वर दिले. त्यामुळे खंडोबाला मल्लारी नाव प्राप्त झाले. खंड म्हणजे तलवार धारण करून पराक्रम व पुरुषार्थ, न्याय व विजय यांचे प्रतीक देवता श्री खंडोबा होय. परमेश्वर नेहमी सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचे पारिपत्य करण्यासाठी अवतार घेतो, हा विश्वास पराक्रमाला लोककल्याणाची जोड व आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून देतो. पराक्रमाला नैतिकतेचे बळ लाभून तो पुरुषार्थ बनतो. राजसत्तांचे अधिपती, कुलपती कसे असावेत, यांचे आदर्श या कथांतून समाजाला मिळतात. या मातीतली माणसे अत्याचार करीत नाहीत, तसेच अत्याचारापुढे नमते घेत नाहीत. स्वाभिमानी बाणा या कुलदैवताच्या कृपेने प्रत्येकाला लाभला आहे. महाराष्ट्र व कर्नाटक भक्तीच्या क्षेत्रात सदैव एकजीव राहिले आहेत. तसाच सहबंध पंजाबशी ही प्राचीन काळापासून आहे. पंजाबात नृमुंडा गावाजवळील गुहेत खंड महादेवाची व सप्तऋषींच्या मूर्ती आहेत. तेथील तीन मैलांवर कार्तिक स्वामींचे मंदिर आहे. धर्म व वीरश्रीचा अपूर्व समन्वय असलेले कुलदैवत श्री खंडोबा शैव, वैष्णव समन्वयाचेही प्रतीक आहे. सर्व जाती, धर्मांच्या प्रदेशाच्या भक्तांचे हे आराध्यदैवत सामाजिक समरसतेचा आदर्श आहे. 'मल्लारिमहात्म्य' ग्रंथात खंडोबाचा उल्लेख महिमयी मूर्ती असा केला आहे. ही मूर्ती मातीची असून चतुर्भुज स्वरूपाची वर्णिली आहे. हा ग्रंथ संस्कृतात इ. स. 13/14 व्या शतकात लिहिला गेला; परंतु सामान्य जनमानसात मात्र ही उपासना खूप प्राचीन काळापासून रूढ होती. जनतेने तत्त्वज्ञानाच्या गूढार्थात जाण्यापेक्षा हृदयस्पर्शी सरस लोकगाथांची निर्मिती करून सोन्याच्या जेजुरीचे वैभव शब्दबद्ध केले आहे. त्यात अनेक कन्नड भाषेचे शब्द असलेली प्राकृत बोली प्रयुक्त केली आहे. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून चंपाषष्ठीपर्यंत कुलदैवत श्री खंडोबाचा षड्रात्रौत्सव साजरा केला जातो. षष्ठीच्या दिवशी कुळधर्म होतो. खंडोबाचा टाक घरोघरी देव्हार्यात पूजला जातो. प्रसंगपरत्वे खंडोबाची तळी भरली जाते. लोकाचार व लोकसंस्काराशी निगडित असलेल्या या उपासना आध्यात्मिक असल्यामुळे शाश्वत राहिल्या आहेत. ही आध्यात्मिकता जपणे व कालबाह्य तसेच मूल्यहीन रूढी काढून टाकणे, त्यागणे, आवश्यक आहे. बळीप्रथा, देवदासी प्रथा कधीच भूषणावह नव्हती व नाही. अज्ञान वाढवणार्या, माणुसकी विसरणार्या अशा प्रथा अध्यात्माशी संबंधित नाहीत. कुणी संत, भक्तांनी कधीही याची पाठराखण केली नाही. म्हणून अशा चुकीच्या प्रथा बंद होऊन त्यातला अध्यात्म भाव, ऐतिहासिक गौरव, सामाजिक आत्मियता अधिक प्रकर्षाने नव्या पिढीसमोर स्पष्ट झाली पाहिजे.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी

त्यास पुढील काळात अनेकांनी उचलून धरले. परंतु, १९२५ आधी श्री साईबाबांचे जन्मस्थान पाथरी असावे याबाबत कुठे पुसटसाहि



उल्लेख आढळत नाही. जून २०१४ मध्ये द्वारका आणि ज्योतिष पीठाचे शंकराचार्य असलेले जगद्गुरू स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी श्री साईबाबांच्या पूजेला आपला विरोध दर्शवला. [६] या विधानाने प्रेरित होऊन साईबाबा हे चांदमिया असून त्यांची पूजा करू नये अशी निरालस आणि तथ्यहीन वक्तव्य करून श्री साईबाबांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. श्री साईबाबा हे नानासाहेब पेशवे आहेत अशा आशयाचे लिखाणही श्री साईबाबांच्या बाबतीत झाले. परंतु साईभक्त हा मुळातच सकलमताचा आदर करणारा असल्याने अशा अनेक अफवा पचवून तो साईबाबांच्या भक्तीपथावर श्रद्धा आणि सबुरीचा संदेश पुढे नेत मार्गक्रमण करत आहे. श्री साईबाबांची नोंद तत्कालीन सरकारी कागदपत्रात अवलिया अशी सापडते. त्याहून महत्वाची गोष्ट अशी की त्याकाळी गुप्तहेर खाते आणि अधिकाऱ्यांनी श्री साईबाबांचे मूळ अज्ञात असल्याचे साईकालीन रिपोर्ट आणि ऑर्डरमध्ये स्पष्ट केले आहे. " जन्म बाबांचा कोण्या देशी । अथवा कोण्या पवित्र वंशी । कोण्या मातापितरांच्या कुशी । हे कोणासी ठावे ना ।। " या श्री साईसच्चरितातील अध्याय ४ मधील ११३व्या ओवीत[७] उल्लेख केल्या प्रमाणे बाबांच्या जन्माबाबत कुठेही कोणतीच खात्रीलायक माहिती सापडत नाही.



आधुनिक केसरी

### डोले पांडुरंग | काळजात का ||

आनंदाचा कंद | गावला आम्हासी ||
नाम ऋषिकेशी | येता मुखी ||१||
लागलेसे ध्यान | हरपले भान ||
विकार बंधन | दूर झाले ||२||
एकचित्त झालो | नाचलो वारीत ||
रंगलो रंगात | सावळ्याच्या ||३||
चंद्रभागे तीरी | वैष्णवांचा मेळा ||
भेटीचा उमाळा | अनावर ||४||
भक्तीची लेखणी | आळवी अभंग ||
डोले पांडुरंग | काळजात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

प्रत्येक भूतामध्ये क्षणाक्षणाला सारखा बदल होत असतो हे बदल सांगणे




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

केवळ अशक्य होय. पंचमहाभूते व तीन गुण यांच्या परस्पर मिश्रणाचा अवाढव्यपणा त्यामध्ये होणारे बदल यांचा अभ्यास म्हणजे गेला एक आठवडा झाला. या दशक नववा समास सहावा याचा माझ्या अल्पमतीने मांडण्याचा प्रयत्न केला .तो गोड मानून घ्यावा पण गुणमय प्रकृतीचे निरसन अगदी सावकाश व विवेकाने करत रहावे जोपर्यंत जीव आहे तो पर्यंत या सर्वांचाच आपल्याला आधार हवा आहे हे लक्षात घेऊन परमात्म्याच्या ठिकाणी सतत नतमस्तक व्हावे.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

गूँगा प्रेम प्रसन्न से, कर अँगूर रस पान ।
सोय स्वाद नहिं कहि सके, मनहिं मन अनुमान ।।०८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/०८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मुका व्यक्ती द्राक्षाच्या रसाचे पान करतो पण त्याच्या आस्वाद सुखाचे वर्णन करू शकत नाही. तो मनातच त्या रसास्वादनाचा विचार करतो, कारण वर्णन करण्यासाठी त्याच्याकडे वाणी नाही. अशाच प्रकारे ब्रह्मसुख उपभोगणारा आत्मा, मुक्या व्यक्ती प्रमाणे त्या सुखाचे वर्णन करू शकत नाही. ब्रह्मसुख हा आत्म्याचा विषय आहे, इंद्रियांचा नाही. म्हणून त्याचे वर्णन होऊ शकत नाही.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## भगवंताच्या नामानेच वासनाक्षय !

आधुनिक केसरी

आपण सर्व जीव वासनेत गुंतलेले आहोत, कारण आपला जन्मच वासनेत आहे. वासना म्हणजे, 'आहे ते असू द्याच, आणि आणखीही मिळू द्या' असे वाटणे. आपण सध्या या स्थितीत आहोत. पण सुरुवात म्हणून आपण असे म्हणावे की, 'आहे ते असू द्या, आणि आणखी मागायचे ते परमेश्वराजवळ मागू या.' म्हणजे, मिळाले तर 'भगवंताने दिले', आणि न मिळाले तर 'त्याची इच्छा नाही', अशी जाणीव होऊन 'दाता परमात्मा आहे' ही भावना वाढू लागेल; आहे तेही त्याच्याच इच्छेचे फळ आहे असे वाटू लागून अस्वस्थता आणि आसक्ती कमी होऊ लागेल; आणि आसक्ती कमी होऊ लागली की, 'हवे-नको' कमी होऊन वासना ओसरू लागेल. केवळ आपल्या कर्तबगारीने वासनेच्या पलीकडे जाणे अशक्य आहे; त्याला शरणागतीशिवाय गत्यंतर नाही. याकरिता योग्य संगतीचाही फार उपयोग होईल. एखाद्या बैराग्याची संगती केली तर स्वाभाविकच कपड्याचे प्रेम कमी होईल, पण एखाद्या शेटजीच्या संगतीत राहिलो तर छानछोकी



करण्याकडे प्रवृत्ती होईल. म्हणून अशा संगतीत राहावे की, ज्यामुळे शरणागती यायला मदत होईल. शरणागती म्हणजे परमेश्वराला सर्वस्वी अर्पण होऊन राहणे; याचाच अर्थ, आपण उपाधिरहित बनणे. तर मग आपण अशाच साधनाची संगती केली पाहिजे, की जे अत्यंत उपाधिरहित आहे. हे साधन म्हणजे भगवंताचे नाम. काळ, वेळ, परिस्थिती, उच्चनीच भाव, स्त्री-पुरुष, विद्वता-अडाणीपणा, श्रीमंती-गरिबी, प्रकृतीची सुस्थिती-दुःस्थिती वगैरे कोणतीही गोष्ट नामाला आड येऊ शकत नाही. तसेच, त्याला कोणतीही उपकरणे लागत नाहीत. ते हृदयात सतत आपल्याबरोबर बाळगता येते. नामात वैराग्याचे कष्ट नाहीत, आणि कुठेही, केव्हाही ते बरोबर नेता येते. त्यासाठी विषयाची तदाकारवृत्ती सोडली पाहिजे. 'भगवंत माझ्या मागे आहे' अशी श्रद्धा राखली की वृत्ती विषयाशी तदाकार होत नाही. मारुतीने दिलेली मुद्रिका पाहिल्यावर सीतेला रामाच्या स्वरूपाची आठवण झाली, त्याप्रमाणे नाम घेताना आपल्याला त्याची आठवण झाली पाहिजे. भगवंताच्या अनुसंधानात जो राहिला त्याने काळावर सत्ता गाजविली. अशा लोकांना मरणाचे भय कुठून असणार ? भगवंताला सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरत नाही; आणि जिथे वासना उरली नाही तिथे काळाचा शिरकाव होत नाही. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. वासनेच्या क्षयामध्ये आपलेपणाचे मरण आहे, आणि हे मरण डोळ्यांनी पाहण्यासाठी आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे.

**३५. वासनेचा क्षय भगवंताच नामात आहे हे अक्षरशः खरे आहे.**

## निरूपण

आधुनिक केसरी

काळवेळ घातनक्षत्र । या नांव आदिभूतिक ॥ ५७॥
सिंक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली ।
चिंता काजळी लागली । या नांव आदिभूतिक ॥ ५८॥
दिवटा सरवदा भाकून गेला । अंतरीं धोका लागला ।
दुःस्वप्नें जाजावला । या नांव आदिभूतिक ॥ ५९॥
भालु भुंके स्वान रडे । पाली अंगावरी पडे ।
नाना चिन्हें चिंता पवाडे । या नांव आदिभूतिक ॥ ६०॥
बाहेरी निघतां अपशकून । नाना प्रकारें विछिन्न ।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ४ मे २०२४
adhunikkesari.com

# पंकजाताईंच्या पाठीशी मतांची ताकद उभी करण्याचा निर्धार

## आसरडोहमध्ये पंकजाताई मुंडे यांचे रमेश आडसकरांनी केले जबरदस्त स्वागत

आधुनिक केसरी न्यूज



**धारुर :** भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे आपल्या जिल्हयाला लाभलेलं एक सक्षम नेतृत्व आहे तर दुसरीकडे समोरचा उमेदवार कोण यापेक्षा त्या उमेदवाराचा अनुभव आपल्या परिसरातील सर्वच लोकांना आलेला आहे, त्याबद्दल वेगळे सांगायची आपल्याला गरज नाही. या निवडणूकीत राष्ट्रवादीच्या बजरंग सोनवणे यांना हाबाडा दाखविल्याशिवाय राहणार नाही अशा शब्दांत भाजप नेते रमेश आडसकर यांनी विरोधकांचा जाहीर सभेत खरपूस समाचार घेतला. दरम्यान आसरडोह येथे काल आडसकर यांनी पंकजाताई मुंडे यांचे जबरदस्त स्वागत केले. पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ गुरूवारी संध्याकाळी आसरडोह येथे झालेल्या पंचक्रोशीतील मतदारांनी मोठी गर्दी केली होती. पंकजाताईंचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी एकच जल्लोष करत त्यांचं जबरदस्त स्वागत केले. व्यासपीठावर माधवराव निर्मळ यांचेसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आडसकर म्हणाले, आपल्या जिल्ह्याचा चांगला विकास कोण करु शकतयं याचा विश्वास आपल्याला पंकजाताईंमध्ये दिसतो. मंत्री असताना त्यांनी देशात सर्वाधिक 956 कोटींचा विमा जिल्ह्यातील शेतकर्यांना मिळवून देण्याचे काम त्यांनी केले. पिकविमा असेल अतिवृष्टीचे अनुदान असेल, शेतकर्यांना कोणतेही अनुदान देण्याचे काम पंकजाताईंच्या माध्यमातून झाले आहे. अनेक मोठी कामे पंकजाताईंच्या नेतृत्वात यापूर्वी मार्गी लागली आहेत. त्यामुळे भविष्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी पंकजाताईच सक्षम नेतृत्व आहेत, याची जाण ठेवून या लोकसभा निवडणूकीत जातीवाद, गट-तट विसरुन एकदिलाने पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मताधिक्य देवून विजयी करा.

आज मोठी लग्नतिथी असतानाही सभेला मोठी गर्दी झाली. याबद्दल आभार व्यक्त करत रमेश आडसकर म्हणाले, पंकजाताई मुंडे यांना आपल्या भागातील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मोठ्या मताधिक्याने निवडून द्यायचे आहे. जातीपातीच्या राजकारणासाठी नव्हे तर विकासासाच्या राजकारणासाठी आपण सर्व जण काम करतो आहोत. वेगवेगळ्या माध्यमातून पंकजाताईंनी विकासाची प्रलंबित कामे मार्गी लावलेली आहेत, जिल्ह्यात दुष्काळ पडला त्यावेळी पशूधन वाचवण्यासाठी छावण्या देण्याचे काम पंकजाताई मुंडेंनी केले. कोव्हिड काळातही पंकजाताईंनी सत्ता नसतानाही या भागातील लोकांसाठी मोठे काम केले. धारुरला कोव्हिड सेंटर सुरु केले, याची जाण आपण प्रत्येकाने ठेवली पाहिजे. आता पंकजाताई बीड जिल्ह्याच्या खासदार झाल्या तर जिल्ह्याचा सर्व बाजूने विकास होण्यास मदत होणार आहे, त्यासाठी येत्या 13 तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताईंना विक्रमी मताधिक्याने निवडून द्या असं आवाहन त्यांनी केले.

# अजिंठा घाटात पुणे ते रावेर बस घाटात पलटली; ९ जखमी

## स्थानिक ग्रामस्थ व पोलिसांची अपघातस्थळी धाव; जीवितहानी नाही

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा येथील घाटात राज्यातील महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या रावेर आगारची बसची दूरवस्था झाल्यावरुन नेहमीच टीका करण्यात येत असते. बसमधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो, कधी बसचं सीटच हलत असतं, तर खिडकीच्या काचा थडथड वाजत असतात, तर कधी पावसाळ्यात पत्र्यातून पाणीच बसमध्ये शिरते. मात्र, कधी कधी याच बसच्या दयनीस अवस्थेमुळे वाहक-चालकही खासगीत संताप व्यक्त करतात. त्यामुळे, काहीवेळा ह्या बस अपघाताचे कारणही ठरतात. तर, गेल्या काही दिवसांत अपघातांच्या घटनातही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. नुकतेच अजिंठा घाटात पुणे ते रावेर जाणारी एसटी MH40-Y 5197 हि रोडच्या बाजूला जाऊन पलटी आहे. या बसचा भीषण अपघात झाला. त्यामधे ९ प्रवासी जखमी झाले आहे. अपघाताचे वृत्त कळताच फर्दापूर येथील सपोनि प्रफुल्ल साबळे व पूर्ण स्टॉपसह घटनास्थळी जाऊन सदर ठिकाणी ॲम्बुलस बोलावून जखमींना हॉस्टपिटला पाठवून देण्यात आले. घाटातील वाहतूक सुरळीत करुन हा अपघात अजिंठा पोलिस ठाणे हद्दीत असल्याने वाहक व चालक यांना अजिंठा पोलिस स्टेशनमध्ये पाठविण्यात आले.बसचालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या बसमधून 66 प्रवासी प्रवास करत होते. तब्बल 66 प्रवासी घेऊन जाणाऱ्या या बसला अपघात झाला असून अपघातात 7 ते 8 जण जखमी झाले आहेत. पुणे ते रावेर प्रवास या मार्गावरुन ही बस धावत होती. मात्र, अजिंठा घाटात येताच, चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात 7 ते 8 प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच, स्थानिकांनी व पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन मतदकार्य सुरू केले. अपघातामधील जखमी प्रवाशांना उपचारासाठी अजिंठा येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तर, काही जणांना खासगी रुग्णालयाही उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, बस रस्त्यावरुन खाली घसरल्याने पलटी होवून बसचेही मोठे नुकसान झाले आहे. बसच्या पुढील व पाठीमागील बाजूच्या काचा फुटल्या असून टायरही निखळल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी आगार प्रमुखांना माहिती देण्यात आली आहे.

त्यानंतर, आगारीतल संबंधित अधिकाऱ्यांनाही घटनास्थळी जाऊन पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार अधिकाही अपघातस्थळी पोहोचल्याचे दिसून आले. जखमी झालेले प्रवासी पुढील प्रमाणे - सुशिलाबाई दिनकर निर्खे वय 70 राहणार जामनेर, दुखापत- 2 )सरुबाई शामराव पाटील वय 65 राहणार श्रीरामपूर, 3 )वसंत विठ्ठल पठारे वय 65 वर्षे राहणार सोयगाव, 4 )निखिल किरण पाटील वय 13 वर्षे श्रीरामपूर, 5 )सुमित्रा दिनकर निर्खे वय 48 वर्ष राहणार जामनेर, 6 ) विजय हरी सूर्यवंशी वय 72 वर्ष राहणार जामनेर, 7 )संध्या वसंतराव पठारे वय 63 वर्ष राहणार सोयगाव, 8 )जय मला विजय सूर्यवंशी वय 60 वर्ष राहणार जामनेर, 9 )ज्योती साई चंद्र बासनेवल वर्ष 40 राहणार संभाजीनगर.



# संजय जाधव पोलीस महासंचालक पदकाचे मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** महाराष्ट्र पोलीस दलामध्ये पुणे शहर गुन्हे शाखा युनिट दोन मध्ये पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असणारे कर्तव्यदक्ष संजय पंढरीनाथ जाधव यांचा नुकताच पोलीस महासंचालक पदक देऊन गौरव करण्यात आला आहे.

एक मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या मुहूर्तावर राज्यांमध्ये उत्कृष्ट पोलीस दलात काम करणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचारी यांचा गौरव करण्यात येतो. तसा यावर्षीही उत्कृष्ट पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संजय पंढरीनाथ जाधव पोलीस हवालदार म्हणून हे १९९७रोजी पोलीस दलात मुंबई येथे रुजू झाले. मुंबईनंतर ते २००५ साली पुणे शहर पोलीस येथे आले. आत्तापर्यंत त्यांनी पोलीस मुख्यालय, विश्रामबाग पोलीस स्टेशन,भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन आणि आत्ता सध्या पुणे शहर गुन्हे शाखा युनिट दोन येथे ते काम करीत आहे. त्यांच्या आतापर्यंतच्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना दि.१ मे रोजी पोलीस महासंचालक पदक देऊन सन्मानित केले. माननीय पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार पुणे शहर यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे त्यांना सन्मानित करण्यात आले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी बजावली. सदरक्षणाय खलनिग्रहणालय या ब्रीदवाक्यप्रमाने त्यांनी आतापर्यंत काम केल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. संजय पंढरीनाथ जाधव हे अतिशय कर्तव्यदक्ष, निस्वार्थी व कायद्याचा अभ्यास असणारे पोलीस हवालदार असून त्यांना पोलीस महासंचालक पदकाने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# शेतकरी कर्जमाफी योजनेपासून ठेवले वंचित; शेतकऱ्यांची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** तत्कालीन फडणवीस सरकारने २८ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमुक्ती योजना अंमलात आणून सदर योजनेप्रमाणे ३० जून २०१६ रोजी थकीत असलेले मुद्दल व त्यावरील व्याजासह १.५ लाख रुपये मर्यादेपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेऊनही कोपरगाव तालुक्यातील धारणगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने आपल्या अनेक कर्जदारांना वंचित ठेवल्याची तक्रार शीतल चंद्रभान चौधरी यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना केली आहे. या बाबतचे सविस्तर वृत्त असे की,"राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री यांनी शेतकरी संघटनांच्या 'शेतकरी संप' आंदोलनामुळे २८ जून २०१७ रोजी शेतकऱ्यांना दिड लाख रुपये कर्जमुक्तीची घोषणा केली होती. मात्र अंमलबजावणी करताना सरकारने आपले कर्ज पोर्टल अचानक बंद करून सुमारे ०५ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले होते. दरम्यान या घटनेविरोधात शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (छ.संभाजीनगर) खंडपीठात याचिका क्रमांक ९८०८/२०२२ दाखल केली होती. यावर न्या. रविंद्र घुगे आणि अरुण पेडणेकर यांनी सदरील शेतकऱ्यांना दिड लाख रुपये प्रमाणे कर्जमुक्ती करण्याचा आदेश दिला होता. तरीही शेतकऱ्यांना रक्कम मिळत नाही म्हणून न्यायालयाच्या अवमानाची याचिका दाखल केली. न्यायालयाने नोटीस बजावल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपूर अधिवेशनात दिड लाखाच्या कर्जमुक्तीची रक्कम देण्याची मोठी 'राणा भीमदेवी' थाटाची घोषणा केली होती. परिणामी राज्यातील शेतकऱ्यांना सुमारे सहा हजार कोटी रुपयांचा लाभ मिळाला आहे.या यशाबाबत नेवासा, श्रीरामपूर, राहाता, कोपरगाव आदी तालुक्यातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असताना कोपरगाव तालुक्यातील धारणगावं विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचा एक कर्जदाराच्या बाबतीत एक गलथानपणाचा गोंधळ समोर आला असून १२ पैकी ०७ जणांचे कर्ज वसूल करून त्यांना कर्जमाफी पासून वंचित ठेवले असल्याची घटना समोर आली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.त्याबाबत कर्जदार राजेंद्र हरिशचंद्र देवकर यांचेसह महिला शीतल चंद्रभान चौधरी यांच्यासह अनेक कर्जदार शेतकऱ्यांनी सहकार विभागाचे सहाय्यक निबंधक,कोपरगाव यांचेकडे लेखी तक्रार केली होती.त्याबाबत त्यांनी उलटसुलट उत्तरे देऊन शेतकऱ्यांनी दिशाभूल केली असल्याचे उघड झाले आहे.व बारा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा रकमा जाणीवपूर्वक सरकारला परत पाठवल्या असल्याचे दिसून आले आहे. तर सहकार विभागाने सदर कर्जाच्या रकमा तांत्रिक कारणाने परत गेल्या असल्याची बतावणी केली आहे. त्यामुळे यासंबंधी सदर बाधित शेतकऱ्यांनी नुकतीच आ. आशुतोष काळे यांचेकडे या अधिकारी आणि संस्थेची तक्रार केली असून त्यांनी याबाबत बँक अधिकारी व संस्थेचे सचिव व पदाधिकारी यांची संयुक्त बैठक लावली होती त्यात त्यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांची चांगलीच खरडपट्टी काढली असल्याची माहिती हाती आली आहे. या संबधी सदर अपात्र ठरवलेले कर्जदार शेतकरी यांनी नुकतीच उच्च न्यायालयाचे वकील व शेतकरी संघतेनेचे प्रदेश उपाध्यक्ष अड्.अजित काळे यांची भेट घेतली असल्याची विश्वसनीय माहिती हाती आली असून या प्रकरणी उच्च न्यायालयाचे लक्ष वेधून घेणार असल्याची माहिती हाती आली आहे. त्यामुळे बेजबाबदार अधिकारी आणि सेवा संस्थेचे पदाधिकारी यांचे धाबे दणाणले आहे.

# हिंदू खासदाराने सुनावले

आधुनिक केसरी

पाकिस्तानमध्ये धार्मिक अल्पसंख्याकांवर अत्याचार होत असल्याचा मुद्दा अनेकदा उपस्थित झालेला आहे. संयुक्त राष्ट्रानेही मागील महिन्यात अल्पसंख्याक समाजातील महिला आणि मुलींचे रक्षण करण्यात पाकिस्तान सरकार कमी पडत असल्याचे म्हटले होते. त्यानंतर आता पाकिस्तानच्या संसदेत एका हिंदू खासदाराने पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. पाकिस्तानच्या काही प्रांतामध्ये स्थानिक गुंड आणि समाजकंटकाकडून हिंदू मुलींचे अपहरण करून त्यांचे धर्मांतर होत असल्याचा मुद्दा खासदार दानेश कुमार पलायानी यांनी उपस्थित केला. तसेच पाकिस्तानचे संविधान आणि कुराण कुणाचाही धर्म बदलण्याचे अधिकार देत नाही. खासदार दानेश कुमार पलायानी पुढे म्हणाले, सिंद प्रांतात हिंदू मुलींचे बळजबरीने धर्मांतर केले जात आहे. हिंदूंच्या मुली या लुटीचा माल नाहीत की, कुणीही त्यांचे धर्मांतर करेल. दोन वर्षांपूर्वी प्रिया कुमारी नावाच्या मुलीचे अपहरण करण्यात आले. दोन वर्षांपासून सरकारने आरोपींविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. काही गुंड आणि दरोडेखोर आपल्या देशाचे (पाकिस्तान) नाव धुळीस मिळवत आहेत. पाकिस्तानचे संविधान आणि कुराणदेखील कुणाचेही बळजबरीने धर्मांतर करण्याची परवानगी देत नाही. महिन्याभरापूर्वीच संयुक्त राष्ट्रांमधील तज्ज्ञांनी पाकिस्तानमध्ये महिलांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत चिंता व्यक्त केली होती. "पाकिस्तानमधील ख्रिश्चन आणि हिंदू मुली मोठ्या प्रमाणात अत्याचारास बळी पडत आहेत. त्यांचे बळजबरीने धर्मांतर केले जाते, अपहरण, मानवी तस्करी, बालविवाह आणि लैंगिक अत्याचारासारखे गुन्हे त्यांच्याबाबतीत होत आहेत, असा अहवाल संयुक्त राष्ट्रांच्या तज्ज्ञांनी दिला होता. अल्पसंख्याकांच्या मानवी अधिकारांचे होणारे उल्लंघन आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला सहन केले जाणार नाही असेही संयुक्त राष्ट्रांनी ठणकावले होते. दानेश कुमार पलायानी यांनी संसदेत ज्या प्रिया कुमारी या मुलीचा उल्लेख केला, ती मुलगी केवळ सहा वर्षांची आहे. या मुलीच्या अपहरणामागे सिंध प्रांतातील एका पुढाऱ्याचा हात असल्याचा संशयही पलायानी व्यक्त केला. पलायानी म्हणाले की, आरोपीला अटक करण्याची सरकारमध्ये धमक नाही, त्यामुळे अल्पसंख्याकांना न्याय मिळत नाही. बीबीसीने २०१४ साली दिलेल्या एका अहवालानुसार, पाकिस्तानमध्ये दरवर्षी अनेक ख्रिश्चन आणि हिंदू मुलींचे जबरदस्तीने धर्मांतर करण्यात येते. कधी कधी त्यांच्या इच्छेविरुद्ध जाऊन त्यांचे लग्न लावून देण्यात येते. "पाकिस्तानमध्ये कट्टरतावाद वाढू लागल्यामुळे देशातील १० टक्के अल्पसंख्याकांपुढे जगण्याच्या समस्या उभ्या राहिल्या आहेत, असेही या अहवालात म्हटले गेले होते.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# शरद पवारांनी पंढरपुर, तुळजापुर दर्शन घेणं नाटकच

आधुनिक केसरी

**लोकसभा निवडणुक प्रचारात केवळ मतं मिळवण्यासाठी महाविकास आघाडीचे प्रमुख शरदचंद्रजी पवार पंढरपुर, तुळजापुर दर्शन वारी करत असले तरी आयुष्यभर पुरोगामी विचाराचा दिंडोरा पिटवत मंदिरापासुन मी दुर कसा आहे दाखवण्याचा केलेला प्रयत्न जनता कुणी विसरली नाही. आज त्यांचं मंदिरात जाणं आश्चर्य म्हणावे?तर दुसऱ्या बाजुने केवळ मतं मिळवण्यासाठी साहेब कधी काय करतील? देव जाणे. काही दिवसापुर्वी पक्षाच्या वतीने काढलेल्या कॅलेंडरवर वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असलेल्या पांडूरंगाच्या चेहऱ्यावर चक्क बोकड आणि चाँद ताऱ्याचे चित्र प्रसिद्ध करून धर्मनिरपेक्षवादी दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न हिंदु भावनेला ठेचा मारण्यासारखा होता.**

तसं तर हा भाविक भक्तासह हिंदु भावनेचा अपमान देखील त्यांनी केला पण साधी माफी मागितली सुद्धा नव्हती. आषाढी वाढी दरम्यानच मागच्या वर्षी प्रकार उघडकीस आला होता तेव्हा वारकरी संप्रदायात संतापाची लाट पसरली होती. आता हे पवार बाह्यअंगाने मंदिरात जात असले तरी अंतर्मनात असलेली नास्तिक भावना मुखाद्वारे कधीही बाहेर पडते. त्याहुन अधिक त्यांचा मुळ स्वभाव पहाणारे हे नाटकं पाहुन हसु लागले हे मात्र नक्की.

चार दशकाहुन अधिक महाराष्ट्राच्या राजकिय व्यवस्थेत शरद पवार नेतृत्वाचा वरचष्मा राहिलेला हे सत्य कुणीच नाकारू शकत नाही. सत्तास्थानावर बसण्यासाठी कपटनिती कधीच सोडलेली नाही. काहीही करेल पण खुर्ची मिळवेल हा त्यांचा मुळ राजकिय आकांक्षाचा भाग ज्यांनी एकेकाळी वसंतदादा पाटलांच्या पाठीत खंजीर खुपसला परिणामी मुख्यमंत्री पद मिळवलं. देशाच्या राजकारणात शिरकाव झाल्यानंतर इंदिरा गांधीसोबत देखील त्यांनी धोकाधडीचं राजकारण केलं. त्यांचा मुळ डीएनए मागे वळुन पाहिलं तर स्व.यशवंतराव चव्हाण ज्यांना ते गुरू मानतात. त्या काँग्रेस पक्षात साहेब कधीच स्थिरावले नाहीत. राजकिय महत्वाकांक्षा आणि महाराष्ट्र हातात ठेवणं अनेक वर्षे त्यांना जमलं. जातीपातीच्या आधारावर जेव्हा महाराष्ट्राचे राजकारण फुगल्या गेले तेव्हा अनेकदा निवडणुका जिंकण्यासाठी हा प्रयोग त्यांनी केला. सत्ता पदावर असताना शिवरायाच्या गडकिल्ल्यावर ना कधी गेले ना कधी विकास केला. मात्र निवडणुक काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराचा वारसा घेवुनच अनेकदा फायदा घेतला. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी देखील शरद पवारांचा हाबाडा अनुभवला. एवढेच नव्हे तर आज ज्या सोनिया गांधीच्या पंक्तीत शरद पवार बसले पण एक काळ असा होता की परदेशी महिला म्हणुन त्यांनी सोनिया गांधीला पंतप्रधान पदापासुन रोखले हा इतिहास अद्यापही पुसला गेलेला नाही. पुलोद स्थापना, नंतर काँग्रेस प्रवेश, पुन्हा काँग्रेस बाहेर तदनंतर राष्ट्रवादी पक्षाची स्थापना याचाच अर्थ एवढ्या मोठ्या पवार साहेबांनी राजकिय आयुष्यात केलेला प्रवास वैचारिकदृष्ट्या निष्ठेचा आणि तत्वाचा नव्हता हे तितकंच खरं. राहुल गांधीचं कौतुक आज त्यांच्यावर वेळ आली म्हणून करत असले तरी याच पवार साहेबांनी बिचाऱ्या राहुल गांधींच्या मातोश्रीला पंतप्रधान होवु नये म्हणुन परदेशी महिला असं म्हणत देशात राळ उठवुन दिली होती. इटालिअन महिला असाही उल्लेख तत्कालीन काळात झाला होता. मुळात राजकारण करताना पवारांनी नेहमीच जात-पात धर्मावर आधारीत राजकारण केलं. मी म्हणजे महाराष्ट्राचा मालक अनेक वर्षे ती डोक्यात असलेली हवा सत्तास्थान काबीज करण्यासाठी प्रसंगी यशस्वी ठरली. जातीपातीवर आधारीत व्यक्तिद्वेषाचे राजकारण महाराष्ट्रात त्यांनीच सुरू केलं. खरं तर एक वेळ अशी होती की आज मराठा आरक्षण प्रश्न सुटला नाही. तो खरा पवार साहेबांच्याच काळात मार्गी लागायला हवा होता. अनादी वर्षे सत्ता पदावर असताना प्रश्न मार्गी लावला नाही तेव्हा जाणते म्हणावे तरी



कसे? राजकारणात वेगवेगळे नाटकं करत लोकांच्या समोर जाण्यासाठी त्यांचा हात कुणी धरू शकत नाही. पांडूरंग, तुळजाभवानीचं दर्शन हे तर नाटक?

लोकसभा निवडणुक सुरू असुन आपल्याच कर्माची फळं वयाच्या उत्तरायणात पवार साहेबांना भोगावी लागणं ज्यामुळे आपण स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाची शक्कल पडली. कायद्याने पक्षच अजितदादा पवारांकडे गेला. अर्थात शिव उबाठा असेल किंवा ज्या काँग्रेसला नेहमीच पवारांनी सत्तेच्या राजकारणात पाण्यात पाहिलं. बुडतीला आधार म्हणून पुन्हा सोबत घेत महाविकास आघाडी तयार केली. जास्तीत जास्त खासदार निवडुन आणण्याची रचना त्यांची असणं साहजिकच. पण निमित्ताने स्वतःला पुरोगामी चेहरा दाखविताना आयुष्यभर नास्तिक दाखवायला ते मागे राहिले नाहीत. अंधश्रद्धेवर त्यांचा विश्वास नाही. पंढरपुरच्या निवडणुक प्रचार दौऱ्यात त्यांनी मंदिरात जावुन विठुरायाचं-रूक्मिणीचं दर्शन घेतले. तुळजापुर मंदिरात जावुन भवानीमातेचं दर्शन घेतलं. विठुरायाच्या मंदिरात प्रवेश कर्ते झाल्याबरोबर पांडुरंगाला देखील आश्चर्य वाटलं असेल कारण मागच्या वर्षी अर्थात राष्ट्रवादी पक्ष एकत्र असताना पक्षाच्या वतीने काढलेल्या कॅलेंडरमध्ये पांडूरंगाच्या चेहऱ्यावर चक्क बोकडाचा फोटो आणि त्यावर चाँद तारा प्रकाशित झाला होता. तो विषय राज्यात चांगलाच गाजला होता. अर्थात कॅलेंडर पक्षाचं त्याच्यावर काय प्रकाशित करायचं?हे अधिकार साहेबांकडेच होते. पण अशा प्रकारे त्यांनी का टाकलं असावं? त्याचं कारण आपला पक्ष पुरोगामी,धर्मनिरपेक्षवादी म्हणजेच आम्हाला हिंदु देवदेवता मान्य नाहीत. धर्म पुजा मान्य नाही. एवढंच दाखवायचं असावं. त्यावर कडी म्हणून चाँद तारे अर्थात अल्पसंख्यांकांची मतं मिळवण्यासाठी केलेले लांगुनचालन. खरं तर सोशल मिडियावर कॅलेंडरवरचा फोटो जेव्हा व्हायरल झाला तेव्हा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या भावना संतप्त झाल्या. वास्तविक पहाता हा जाणिवपुर्वक हिंदुत्ववाद्यांचा अपमानच केला होता. आषाढी वारी यात्रा सुरू होती. पाच-सहा लाख वारकऱ्यांनी कॅलेंडरवरचा फोटो पाहिल्यानंतर डोळ्यातुन आश्रु आले होते. अशा प्रकारचा फोटो कॅलेंडरवर कुणीच सहन करणार नाही. पण केवळ जाणीवपुर्वक टाकला होता. ज्यामुळे मताच्या राजकारणात आपण यशस्वी होवु. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान महाराष्ट्रातील वारकरी तो फोटो अद्याप विसरलेले नाहीत. कारण ऱ्हदयाच्या भावनेला जणु काही ठेचुन काढलं. हाच प्रकार जाणिवपुर्वक केला होता.वेळ आली म्हणून आज साहेब कुठेही गेले तरी मंदिरात त्यांचं जाणं राजकिय नाटकच समजावे लागेल. नैतिकदृष्ट्या त्यांच्या ऱ्हदयात परमेश्वर भावना नाहीच. आयुष्यात त्यांनी असं वागल्यामुळेच वयाच्या उत्तरायणात नको ते रामायण त्यांना याचि देहि, याचि डोळा पहावा लागत आहे. कॅलेंडरवर अशा प्रकारचा घाणेरडा फोटो प्रकाशित होतोच कसा? केवळ आम्ही धर्मनिरपेक्ष, पुरोगामी विचाराचे दाखवण्यासाठीच यापेक्षा दुसरं काहीही नाही. महाराष्ट्र संतांची भुमी आहे. वारकरी संप्रदायाचा विचार डोळ्यासमोर ठेवुन प्रत्येक माणुस चालतो. पांडुरंग प्रत्येकाच्या ऱ्हदयाचा आत्मा त्यामुळे लोकसभा निवडणुकीत सुज्ञ मतदार त्या फोटोचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही.

***मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव***
***देव बाजारचा भाजीपाला नाही रे,***
***देव अशाने भेटायचा नाही रे.....***
***जैसा कर्म करेगा, वैसाही फल देगा भगवान***

मनुष्य जैसा कर्म करता है, वैसाही फल भोगता है. पवार साहबने जिंदगी में जो कर्म करा वही आज उनको भुगतना पड रहा है. एक ससुर अभीभी राजनितीमें देखकर अपने बहुको अपना नही मानता. इससे दुर्भाग्य कर्म दुसरा नही होता.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# भौतिक सुविधा कितीही मिळवा, ज्ञानाशिवाय आत्मसुख लाभत नाही

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात आपण सुखी व्हावं म्हणून प्रयत्नशील असतो.पण कितीही प्रयत्न केले तरी देखील आपण सुखी होतं नाहीत हे वास्तव आहे. मग नेमकं सुख कशात आहे संबंध आयुष्भर वणवण करत आपण जे काही मिळवतो त्या मध्ये सुख नाही हे आपल्याला शेवटी कळतं ते आणि ते नेमकं शेंड्यावरच शहाणपण ठरत.मुळात काय हितकारक आणि काय निरपयोगी हे योग्य वेळी समजल पाहिजे. धन,द्रव्य,संपत्ती यामुळे भौतिक सुख साधनं,वेगवेगळ्या प्रकारच्या भव्य दिव्य वस्तू मिळतीलही परंतु या वस्तू मिळाल्या म्हणजे सुख मिळालंच असं होतं नाही सुखाची अनुभूती घेण्यासाठी आत्मज्ञान महत्वाचं आहे.ज्ञान प्राप्ती म्हणजेच एक अर्थाने सुखाची प्राप्ती होते. जीवनगाडा संसार म्हटलं कि व्यक्ती आयुष्भर सुख मिळविण्यासाठी विविध उपभोग वस्तू गोळा करण्यासाठी प्रयत्नशील असतो.**

अनेक अशा नानाविध प्रयत्नानंतर सर्व भौतिक वस्तू उपलब्ध झाल्या अथवा आपल्याकडं आल्या म्हणजे सुख मिळुन आपली थडपड अहोरात्र मेहनत थांबत नाही अथवा सुख प्राप्त झालं असं वाटतं नाही काहि ना काही मिळवायची सल्ल मनात असते अथवा काही मिळविण्यापासुन आपण वंचित असतो हि सल्ल शांतता लागु देत नाही . शेवटी अनंत अशा प्रयत्नानंतर सृष्टी वरील सगळ्या भौतिक सुखाच्या परिमाणातील वस्तू आपण मिळवल्या तरी पण आपण सुखी होतो का ? जगात आजपर्यंत संपत्ती मिळवुन सुखी झाला असा कोणीही व्यक्ती शोधून सापडणार नाही. मग आपलं सुखाच गणित नेमकं कुठे चुकतंय ते पण शोधण महत्वाचं आहे.आणि जर आपलं गणित चुकत नसेल तर मग प्रचंड अशी संपत्ती मिळवल्यानंतर देखिल आपण सुखी का होतं नाहीत. जगात सर्वात जास्त संपत्ती अर्जित करणारा व्यक्ती सुद्धा सुखी नाही.हे वास्तव आहे म्हणजे कोणत्याही प्रकारच्या भौतिक साधन संपत्ती मध्ये सुख नसुन ते ज्ञान प्राप्ती मध्ये आहे. तरी जगातील बहुतांश माणसं ज्ञान मिळवण्या ऐवजी संपत्ती मिळविण्यासाठी निति , न्याय धर्म,सदाचार या सर्व मार्गांला हरताळ फसुन संपत्ती अर्जित करतात.याच मुख्य कारण हेच आहे कि भौतिक सुख सुविधा साधनं मिळवणं म्हणजे सुख अशी मानसिकता धारणा आपण विकसित केली आहे.म्हणून ज्ञान सदाचार निती धर्मा या ऐवजी संपत्तीला प्राधान्य दिले जाते पण शेवटी ते फसवे निघते.जीवनात संसाराच्या काही गरजा असतात हे कोणीही नाकारू शकत नाही.जीव म्हटलं कि कर्तव्य जबाबदारी आलीच.पण कर्तव्य जबाबदारी पुर्ण करण्यासाठी अनितिचा आश्रय घेण्याची अजिबात आवश्यकता नाही.दोन वेळ अन्न मिळेल आणि अतिथी आला तर उपाशी पोटी जाणार नाही एवढी संपत्ती सत मार्गाने जीवन जगण्यासाठी पुरेशी ठरते. जीवनातील मुख्य आणि महत्वपूर्ण गरजा पुर्ण होण्यासाठी नितिचा मार्ग आश्वासक आणि पुरेसा ठरतो.याचं मार्गाचा अवलंब करत थोड्याफार प्रमाणात धन द्रव्य संपत्ती आवश्यक अर्जित करण्यास हरकत नाही.हि संपत्ती सात्विक सत्यनिष्ठ मार्गाने मिळवता येऊ शकते. ज्याचा उपयोग धर्म आचरण करण्यासाठी व कर्तव्ये पुर्ण करण्यासाठी होईल. आणि याच मार्गाने ती मिळवली पाहिजे. मात्र मिळवत असताना ज्ञान हेच केंद्रस्थानी असल पाहिजे.ज्यांच्या जीवनात ज्ञान केंदस्थानी आहे त्याच्या जीवनात आर्थिक सुबत्ता नसली तरी पण आत्मसुखाची खुप मोठी श्रीमंती असते.

जी कधीच संपत नाही नष्ट होत नाही चोरीला जात नाही अथवा कोणाला चोरून नेता येत नाही. जीवनाचा वास्तविक अर्थ उद्देश हाच आहे कि ज्ञान मार्गाने आत्मसुख प्राप्त झालं पाहिजे.आपण मात्र आत्मसुखा ऐवजी भौतिक सुविधा साधनं एकत्र करून सुख मिळतं असा मनाचा खोटा भ्रम तयार करून आयुष्भर भटकंती करतो . आयुष्भर भटकंती केल्यानंतर शेवटी असं लक्षात येतं कि या सगळ्या वस्तू आपण ज्या मध्ये सुख शोधत होतो त्या निरर्थक आहेत.आणि खरं वास्तविक सुख ज्ञाना मध्ये आहे पण तोपर्यंत आपल्या हातात खुप कमी वेळ शिल्लक असतो.कारण आपण संबंध आयुष्य निरर्थक घातलेलं असतं आणि जेव्हा सत्य उमजत तेव्हा पुरेसा वेळ आपल्याकडं शिल्लक नसतो.या सृष्टीचा निरोप घेणं क्रमप्राप्त असत.म्हणून योग्यवेळी सचेत व्हा जागे व्हा ज्ञान मिळावा आत्मसुख अर्जित करा हिच आयुष्यातील सर्व उत्कृष्ट संपत्ती आहे. ज्यामुळे खरं सुख काय असतं याची अनुभूती आपल्याला घेता येऊ शकते.आणि हिच अनुभुती होण्यासाठी आपण योग्य वेळी जागृत होऊन ज्ञानाला प्राधान्य दिलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पाच वर्षांत सोनवणे कुठल्या बिळात लपले ?

## विकासाचे राजकारण करणाऱ्यांलाच साथ द्या : रमेश आडसकर

### केज मतदार संघात पंकजाताईसाठी आडसकर, मुंदडा, इनामदारांचा एकाच गाडीत दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** लोकसभा मतदार संघातील महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना विजयी करण्यासाठी केज विधानसभा मतदार संघात आप-आपसातील गटातटाचे राजकारण स्थानिक पुढाऱ्यांनी संपवले असून विजयाचा निर्धार करून भाजपाचे नेते रमेश आडसकर, युवानेते अक्षय मुंदडा आणि केज नगर पंचायतचे हारुण इनामदार यांनी एकाच गाडीत बसून प्रचाराला सुरुवात केल्याने कार्यकर्ते आणि सामान्य जनतेत उत्साह निर्माण झाला. गावागावात बोलताना रमेश आडसकरांनी पंकजाताईंचे राजकारण केवळ विकासाचे असून जात, पात, धर्म यावर आधारीत राजकारण कधी केलेच नाही. बजरंग सोनवणे यांना मागच्या लोकसभा निवडणुकीत जनतेने पाच लाख मतदान दिले मात्र पाच वर्षे हा माणूस कुठल्या बिळात लपला असा सवाल आडसकरांनी केला असून सर्व सामान्य जनतेच्या सुख, दुःखाशी त्यांना काही देणे घेणे नसल्याचा आरोप त्यांनी केला. पंकजाताईं यांना केज विधनासभा मतदार संघातून मताधिक्य मिळवून देण्यासाठी स्थानिक नेते आपआपासातील गट-तट विसरून एकत्र असल्याचे चित्र दिसत आहे महायुतीचे सर्व घटक पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते एकसंघ झाल्याने राजकीय दृष्ट्या पंकजाताईंने मतदारसंघात प्रचारात आघाडी घेतल्याचे लक्षात येत आहे. उल्लेख केलेल्या प्रमुख नेत्यांनी कालपासून मतदारसंघात एकत्र येत एकाच गाडीत प्रवास सुरु केल्याने नवीन उत्साह निर्माण झालेला दिसतो. केज तालुक्यात युसुफवडगांव, चिंचोलीमाळी, सादोळा, भालगांव, बाऊची, धनेगांव, केवड, हनुमंत पिंपरी, कापरेवाडी, जाधवजवळा, काळेगांव आदि गावात झंझावती प्रचार दौरा करत वातावरण ढवळून काढले. प्रत्येक गावात नेत्यांचे जोरदार स्वागत ग्रामस्थांनी केले. विकासाच्या प्रश्नावर पंकजाताई यांच्या नेतृत्वावात असलेली क्षमता यातच आमचे भाग्य असून आम्ही त्यांन प्रचंड मतानं निवडून देवू, पालकमंत्री असतांना आमच्या प्रत्येक गावात विकासाच्या योजना त्यांनी दिल्याची माहिती वरील गावातील लोकांनी नेत्यांना सांगितले. दरम्यान मुस्लीम समाजाचे नेते हारुण इनामदार यांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी राजकारण करतांना कधीच जातीपातीचे केले नाही तोच आदर्श डोळयासमोर ठेवून आमच्या भगिंनी पंकजाताई यांचे राजकारण आहे. आम्हाला पंकजाताईंचे नेतृत्व हवे हाच भाव आता मुस्लीम समाजात सर्वत्र निर्माण झाला. मोठया प्रमाणावर मताधिक्य मिळवून देणार असे त्यांनी सांगितले. युवा नेता अक्षय मुंदडा बोलातना म्हणाले की, पंकजाताईंच्या मार्गदर्शनाखाली मागील चार वर्षात या मतदार संघात आ नमिताईंच्या माध्यमातून विकासाची गंगा राबवली गाव तेथे विकास हाच आमच्या राजकाराणाचा धर्म आहे. पंकजाताई खासदार झाल्यानंतर केंद्रात मंत्री होतील. आपल्या जिल्हयाचे भाग्य बदलण्याची ताकद त्यांच्या नेतृत्वात असून जनतेने हितासाठी त्यांना प्रचंड मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. दरम्यान रमेश आडसकरांनी ठणकावून सांगताना पंकजाताईंना जाती पातीचे राजकारण केले असते तर आमचे सारखे त्यांच्यासोबत कसे राहिले असते. पंधरा वर्षापासून त्यांच्या राजकारणाचा अनुभव आहे. पालकमंत्री म्हणून त्यांनी आपल्या जिल्हयात उत्कृष्ट कामगिरी केली. सबका साथ सबका विकास हेच त्यांचे धोरण गरिबांच्या कल्याणासाठी कामी येते. हि निवडणुक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असून राष्ट्रीय पातळीवर नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणारच आहेत त्यांच्या सोबत पंकजाताई यांची उठबस झाल्यानंतर विकासाचा महामार्ग आपल्या जिल्हयात निश्चीत येईल त्यामुळे विरोधकांनी कितीही दिशाभूल केली तरी कोणाच्या अमिषाला बळी न पडता पंकजाताईंना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. बजरंग सोनवणे यांना मागच्या निवडणुकीत पाच लाख मते मिळाली पण मतदान देणाऱ्या लोकांची कदर त्यांनी केली नाही. पाच वर्षात साधे तोंडही लोकांना दाखविले नाही त्यांना मतदान मागण्याचा अधिकारच नसल्याचे आडसरकर म्हणाले. या दौऱ्यात केज बाजार समिती सभापती अंकुशराव इंगळे, ॲड शरद इंगळे, सुरेश मुकादम, संभाजी इंगळे, उत्तरेश्वर स्वामी, शिवराज पाटील, अशोक इंगळे, मन्मथ पाटील, संजय लांडगे, युवराज ढोंबळे, सुनिल गुजर, मंगेश गुजर, पशु पाटील, रामकिसन खोडसे, आबा इंगळे, आणेगांव सरपंच आदि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. संयुक्त दौऱ्याला गावागावात प्रचंड प्रतिसाद मिळाला.







# भवन व अंधारी येथे थापा मारणाऱ्यांना जनता आता घरचा रस्ता दाखवणार

### प्रचार सभेत डॉ. कल्याण काळे यांचा विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अंधारी व भवन येथे विकासाच्या नावाखाली केंद्रातील भाजप सरकारने मागील दहा वर्षांत केवळ थापा मारण्याचे काम केले आहे. महागाई, बेरोजगारी वाढली असून, मालाला योग्य भाव मिळत नसल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसह सर्व सामान्य जनता या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता दाखवणार असल्याचा विश्वास जालना लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवारी येथे अंधारी येथे बोलताना व्यक्त केला. जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ जाज सोमवारी बदनापूर तालुक्यातील रोषणगाव, बाजार गेवराई बाजार, तेलगाम जिल्हा परिषद गट व बदनापूर शहराची प्रचार सभा अंधारी व भवन आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जालना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, राष्ट्रबादी काँग्रेस शरदचंद्र पवार जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, माजी आमदार संतोष सांबरे, डॉ. इंद्रजीत सोळंके फर्दापूर, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका अध्यक्ष दिलीप मचे, तालुका उपाध्यक्ष दिलीप देशमुख, सुनील माकोडे, पत्रकार रहीम खान पठाण, प्रमोद कोते, शिवसेना राजेंद्र राख, माजी नगराध्यक्ष ववलू चौधरी, जयप्रकाश चव्हाण, बाबूराव पवार, भानुदासराव घुगे, बाबासाहेब डांगे, दीपक डोंगरे, भास्कर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. कल्याण काळे पुढे म्हणाले, महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गावागावात प्रत्येक घरापर्यंत पोहचून केंद्रातील भाजपा सरकारला खाली खेचण्यासाठी मतदारांशी संपर्क साधून महाविकास आपाडीच्या विजयासाठी प्रयत्न करावा. तत्पूर्वी राजाभाऊ देशमुख, भास्करराव अंबेकर, डॉ. निसार देशमुख, माजी आमदार संतोष सांबरे, बबलू चौधरी आदींनी केंद्र आणि राज्यातील सरकारच्या कारभारावर टीका करून डॉ. कल्याण काळे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. यावेळी ठोंबरे, राम शिरसाठ, रमेश शिंदे, कैलास चव्हाण, विजय जन्हाड, भगवान कदम, लक्ष्मण म्हसलेकर, बाबासाहेव डांगे, अंकुश शिंदे, चितळकर, राजेंद्र जैस्वाल, शेळके, श्रीराम कान्हेरे, राजेंद्र शिनगारे, देहुजी जताड, रामकिसन मेंढरे, अरुण पैठणे, शिवाजी कहाड, संभाजी शेळके, परमेश्वर गोते, भारत मदन, भास्कर शिंदे, पद्माकर पढ्छ, संतोष नागे आदी मोठ्या उपस्थित होते.

# शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याकरीता १५ मेपर्यंत मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडिबीटीच्या संकेत स्थळावर शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावर अनुसूचित जाती प्रवर्गातील शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याकरीता १५ मेपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. नागपूर विभागातील महाविद्यालयामध्ये सन २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेले व शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज HTTPS://MAHADBTMAHAIT.GOV.IN या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावेत.

# साहेब आमच्या गावासाठी योगदान काय ?

### उमेदवारापेक्षा ठेकदार, बगलबच्चे हैराण

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** मुंबईपासून हाकेच्या अंतरावरील हा तालुका मुलभूत सोईसुविधा पासून नागरिक वंचितच, आजही २२ गाव ४२ वाड्यापाड्यावर भिषण पाणी टंचाईच्या "झळा" सुरू आहेत, रोजगारा अभावी पोटाची खळगी भरण्यासाठी माळशेज घाटपरिसरातील ३३ वाड्यावरील अदिवासी घाट माथ्यावरील जून्नर बनकर फाटा या ठिकाणी कांदे लागवडी पहाटे मिळेल वाहन पकडून धाव घेत आहेत,ना रोजगार ना पिण्याचे पाणी अशा विवंचनेच अडकलेले नागरिक आपल्या वाड्या पाड्यावर मताचा जोगवा मागणाऱ्याचे मनोबल खच्चीकरण करीत आहेत, उमेदवारा सोबत त्यांचे बगलबच्चे ठेकेदार, पुढारी, गावात प्रवेश करतानाच नागरिकांच्या फेरी सुरू होतात, "साहेब" मतमागायला आलात परंतु आमच्या गावाच्या विकासा साठी




आज पर्यंत आपलं योगदान काय ? हा सवाल होत असल्याने उमेदवारासह चेल्या चपाट्यांची चांगलीच तंतरली जात आहे.

# जातीला सक्षम करा अद्यापही माती खायला लावू नका : खा. कपिल पाटिल

आधुनिक केसरी न्यूज

**महेश तारमळे**

**ठाणे :** समाजात बुरसटलेल्या विचाराच्या



रुढी,पंरपरेच्या जोखडातुन समाजमुक्त होत नाही, सामाजात अद्यापही शेतकरी कुंटूबातील तरूण, तरूणीच्या लग्नाला नाना अडचणी येतात, साखरपुडा, हळदी, लग्नाच्या बडेजावात शेतकरी भूमिहिन होत चालला आहे, समाज सुधारावा या साठी कसलेच योगदान नसलेले व समाजातील भरल्या पोटाचे, अलिशानगाड्या फिरविणारे मात्र निवडणूकांच्या तोंडावर जातीच्या नावाचा पुलका आणून तेढनिर्माण करण्याचे काम सध्या करीत असल्याचा घणाघात खा.कपिल पाटलांनी केला आहे,जातीचा पुलका निवडणूका पुरता येणारे काही महाभाग असले तरी कुणबी समाजात उच्चशिक्षीत पिढी तयार झाल्याने जातीचे राजकारण करणाऱ्यांना जमालगोटा देतातच हे विसरून चालणार नाही.

सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत कुणबीसेना प्रमुख हे कॉंग्रेस कडून उमेदवारी घेऊन निवडणूक लढले होते व त्यांना देखील कुणब्यांनी न स्वीकारता कपिल पाटांलांना पसंती देत कुणबी उमेदवाराला हि पराभूत केले होते,तेच कुणबी सेनेचे प्रमुख हे भाजपाचे उमेदवार कपिल पाटलांच्या व्यासपिठावर बाजूला बसल्याचे दिसून येताच कुणबीनेते,पुढारी, मतदारांच्या भूवया उंचावल्या आहेत,विशेष म्हणजे या मतदार संघात काही घटक हे जातीच्या नावावर राजकारण करीत आजवर आपल्या पोळ्या भाजीत आले आहेत,तर काही उमेदवार कुणबी मताच्या आशेवर आपल.नशिब अजमावित आहेत,या लोकसभा क्षेत्रात कुणबी मताची आकडेवारी पाहता ४०% सर्वात जास्त मतदार असून वेळप्रंसगाला धाऊन येणाऱ्याच आभार व्याक्त करीत एकोप्यात रहात आले असता,मागिल विस पंचविस वर्षासारखा जातीसाठी माती खा व मला निवडून द्या! ह्या विचाराचा हा समाज राहिला नसून आजच्या घडीला गावोगावी च्या ह्या कुणब्याच्या झोपडीत,घरातील खुंटीला काळे कोट टांगले गेले आहेत,इंजिनियर कृषितज्ज्ञ अशा पदव्या घेतलेले उच्चशिक्षीत, सुज्ञ,तरूणपिढी निर्माण झाल्याने जातीपाती ऐवजी विकास काय हे ज्ञान असलेली सुक्षीशीत पिढी तयार झाल्याने एक प्रकारे जातीची दुकानदारी बंद झाल्यात जमा झाल्या साऱखी झाली आहे,व त्यातच सन २०१९ ला पराभूत झालेले कुणबी नेते हे भाजपात असून हे उमेदवार कपिल पाटलांच्या व्यसपिठावर पहाता स्वताच्या स्वार्थासाठी एकत्र येतात,तसही या मतदार संघातील सर्वच राजकीय पक्षाची ताकद पंचायराज मंत्र्यानी एकाच व्यासपीठावर आणून ठेवल्याने जातीसाठी माती किती दिवस खाणार,तुम्ही पंचपक्कवान खाताय तर त्यानाही गोडधोड खाण्याचे दिवस दाखवायला हवेत,परंतु येथील समाज सुज्ञ झाला असल्याचा अनूभव सन २०१९ च्या निवडणूकात आला असून कुणबी समाज दुसऱ्यांदा जमालगोटा देईल हे येणार काळच ठरविल.

# पंकजाताईचा प्रचार विकासावर, बजरंग सोनवणेचा प्रचार आरोपावर

आधुनिक केसरी

**बीड लोकसभा मतदारसंघात एकुण राजकिय चित्र स्पष्ट झालं असुन उमेदवार तीन डझन असले तरी लढत तिरंगी होते. पंकजाताई मुंडे, बजरंग सोनवणे आणि वंचितकडून अशोक हिंगे प्रत्येक उमेदवारांनी मतदार खेचण्यासाठी प्रचार चालु केला. त्यातही वंचित उमेदवार अशोक हिंगे यांच्याकडे चळवळीतला कार्यकर्ता आणि मराठा आरक्षणासाठी लढणारा सैनिक यातुन पाहिल्या जाते. पंकजाताई मुंडे ज्यांची ओळख राष्ट्रीय स्तरावर आहे, त्याहुन अधिक अनेक वर्षापासुन जिल्ह्याचं नेतृत्व करतात. पाच वर्षे पालकमंत्री म्हणुन काम करताना विकासकन्या असंही त्यांना म्हटल्या जातं. ज्यांनी 25000 कोटी रूपये शासनाच्या तिजोरीतून हिसकावुन आणले आणि जिल्ह्यात विकासाच्या वाटा मोकळ्या केल्या. निवडणुक प्रचार करताना त्यांचा भर जास्त विकास प्रश्नावर असुन कुणावरही टिका न करता मतदार राजाला आपली भुमिका मांडणे यातच धन्य समजतात.**


राम कुलकर्णी




बजरंग सोनवणे जातीपातीचा आधार घेत केवळ आरोपाचं राजकारण प्रचार काळात करत असुन विकासाच्या प्रश्नावर बोलण्यासाठी त्यांच्याकडे काहीच नाही. म्हणून बिनबुडाचे आरोप व्यक्तीद्वेषातुन करण्यात धन्य समजु लागले. ही निवडणुक विकास विरूद्ध आरोप अशी दिसत असली तरी पंकजाताईनं केलेल्या विकासकामाची पुण्याई आणि क्षमतावान महिला नेतृत्व ज्यांना संधी दिली तर भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रांगेत बसण्याची संधी मिळेल. परिणामी जिल्ह्याचे भाग्य उजळेल. हा सारासार विचार आता मतदारांच्या मनात निर्धाराने पक्का होत चालला आहे.

या मतदारसंघात निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं असुन निवडणुक आयोगाचे सर्व सोपस्कार पुर्ण झाल्याने निश्चित किती उमेदवार हा आकडा देखील आता समोर आला. तीन डझनावर उमेदवार असले तरी खरी लढत होते ती म्हणजे पंकजाताई, अशोक हिंगे आणि बजरंग सोनवणे यांच्यातच. याशिवाय आपआपल्या परीने सर्व उमेदवार विजयासाठी निश्चित परिश्रम घेत रहाणार यात शंका नाही. तिरंगी सामना होणार हे चित्र आता स्पष्ट झालं. निवडणुक पुर्वरंगात डोकावुन पाहिलं तर मतदार तथा सामान्य जनता उमेदवाराची तुलना आणि क्षमता हा विचार खऱ्या अर्थाने वैचारिक पातळीवर पुढे आलेला दिसतो. पंकजाताई आणि बजरंग सोनवणे नेतृत्वातली तुलना होवु शकते का?तर निश्चित नाही. पंकजाताई म्हणजे राष्ट्रीय स्तरावर सक्षम राजकारण करणाऱ्या महिला नेतृत्व ज्यांच्याकडे विकासाची दृष्टी आणि समाजातील अठरापगड जातीधर्माच्या लोकांचे कल्याण करण्याएवढी संवेदनशीलता आहे. ज्या नेतृत्वाला सामान्य लोकांच्या प्रती आपलेपणा असतो अशांच्यासाठी हे नेतृत्व दैवी चमत्कार तथा ईश्वरी अंश म्हणुनच आशास्थान असते. त्यांचं राजकारण जिल्ह्यातील लोकांनी जवळुन पाहिलं. मंत्री पदाच्या काळात कशा प्रकारे जिल्ह्याचा कारभार केला? सबका साथ-सबका विकास या सुत्रातुन माझी माणसं-माझा जिल्हा एवढाच हेतु मनात ठेवत त्यांनी जेवढ्या योजना लोकांच्या कल्याणासाठी असतात त्या सर्व आपल्या जिल्ह्यात राबवुन दाखवलेल्या आहेत. जलयुक्त शिवारसारखी योजना शासन पातळीवर प्रभावी ठरली तरी मुळ योजनेचा उगम पंकजाताईच्या कल्पनेतुनच पुढे आला ज्याचा स्विकार महाराष्ट्र आणि राजस्थान सरकारने केला. जिल्ह्यामध्ये 25000कोटी रूपायाचा निधी त्यांनी वेगवेगळ्या योजनेसाठी आणलेला आहेच. सर्वात म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यमान खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या पुढाकारातुन रेल्वेचा प्रश्न मार्गी लागला आणि राष्ट्रीय महामार्ग जवळपास सात ते आठ आपल्या जिल्ह्यातुन गेले. याचि देहि, याचि डोळा जिल्हावासियांनी त्यांचे काम पाहिले असल्याने पंकजाताईच्या नेतृत्वावर लोक जीवापाड प्रेम करतात. त्यांनी कधीच जात-पात धर्मावर आधारीत राजकारण केलं नाही. समस्त मानव कल्याण आणि शेवटच्या माणसासाठी आयुष्य झिजवल्यासारखं एक-एक क्षण वंचित, उपेक्षित, शेतकरी, कष्टकरी, सामान्य लोकांच्या उद्धारासाठी घालवलेलं आहेच. म्हणुनच निवडणुक प्रचार काळात कुणी काहीही म्हणत असले तरी त्यांना सर्व स्तरातुन भरघोस मिळणारा पाठिंबा बरंच काही सांगुन जातो. लोक हे विचार करू लागले की एवढं क्षमतावान नेतृत्व आपण जिल्ह्यातुन दिल्लीला पाठविले तर भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रांगेत बसुन त्यांना काम करण्याची संधी मिळेल आणि पंकजाताईसाठी कोणतीही संधी सामान्य लोकांच्या कल्याणासाठी कामी येते हाच आजवरचा अनुभव नक्कीच. प्रचारकाळात मला केवळ पाच वर्षे द्या, मी आपल्या जिल्ह्याचे भाग्य बदलवुन टाकणार.एखादा मोठा उद्योग आणि कॅन्सरसारखे अद्ययावत हॉस्पीटल उभारण्याचा त्यांचा मानस याकडे लोक देखील आता आशावादातुन पाहु लागले. प्रचार काळात कुणाचं मन दुखावेल अगदी विरोधक उमेदवारावर एका शब्दात आरोप करताना दिसत नाहीत.केवळ विकासाच्या प्रश्नावर निवडणुक जिंकण्याचा दावा त्यांचा आहे आणि तो खरा ठरतोय. महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे निवडणुक मैदानात असुन त्यांनी सुरूवातीपासुनच जात-पात-धर्माचा आधार घेत निवडणुकीला रंग भरला. जो की सामान्य जनतेला अशा



प्रकारचे घाणेरडे राजकारण कधीच जमत नाही. मुळातच राजकिय स्वार्थासाठी अजितदादाला धोका देवुन शरद पवार गटात महाशय गेले. ज्यांना केज नगर पंचायतीच्या निवडणुकीत 400 मतदान असताना आपल्या कन्येला निवडुन आणता आलं नाही. ही राजकिय पत लोकसभा निवडणुक लढवणाऱ्या उमेदवाराची आहे. कुठं तरी मतदार विचार करणार का नाही? हा प्रश्न पडतो. अनेक वर्षापासुन राजकारण करत असल्याचा त्यांचा दावा आहे. खासगी कारखाने उभा करणं हा केवळ व्यक्ती उद्योग म्हणावा लागेल. तोही व्यापारी वृत्तीने चालवला जातो. अनेक प्रश्नावर कारखाना तसा चर्चेत आलेलाच आहे त्यांचा. पण निवडणुकीला सामोरे जाताना एक उदाहरण विकासाचं त्यांच्याच जवळ नाही असे हे उमेदवार 2019 ला देखील उभे होते ज्यांचा पराभव विद्यमान खा.डॉ.प्रितमताई यांनी केला. विकास प्रश्नावर त्यांचा अवतार शुन्य असला तरी मागच्या निवडणुकीत पाच लाख सात हजार मतदान त्यांना मिळालं.

पराभव झाल्यानंतर पठ्याने एकाही मतदाराची भेट सोडा साधा मोबाईल ठोकड्यावर गुड मॉर्निंग देखील घातला नाही. कधीही कुणाच्या सुख दुःखात जिल्हाभरात बजरंग सोनवणे दिसलेच नाहीत. मुळात अशा नेतृत्वाला दुसऱ्यांदा मतदारांच्या दारात जायला तोंड नाहीच. म्हणुनच की काय निवडणुक प्रचार काळात पंकजाताई यांच्यावर आरोप करत लोकांची दिशाभुल करतात. त्यांनी सांगितलं खा.प्रितमताई यांचा निधी परत गेला. काल परवा प्रशासनाकडून सहज माहिती घेतली. तेव्हा 2019 ते 24 एकुण 17 कोटी रूपये विकास निधी कशावर खर्च झाला? ही सर्व माहिती खासदाराकडून समाजमाध्यमावर टाकण्यात आली. एक रूपाया विकासनिधी परत गेला नाही. पण हे महाशय बोलायचं म्हणुन बोलुन जातात आणि निवडणुकीत आरोपाच्या फेऱ्या झाडुन रंग चढवायचा प्रयत्न करतात. काय विकास झाला? हा प्रश्न जेव्हा सोनवणे विचारतात तेव्हा अगदी पाळण्यातल्या लेकराला देखील त्यांची किव येते. ज्या मुंडे भगिनींनी बीड जिल्ह्याचा विकास स्वातंत्र्यानंतर कुणी केला नव्हता. तेवढा विकास करून दाखवला. एकट्या पंकजाताईनं पालकमंत्री असताना 1200 कोटी रूपायाचा विमा जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या पदरात टाकला त्यामुळे अजुनही पंकजाताईच्या कल्याणकारी नेतृत्वाचं आणि सकारात्मक भुमिकेचं सामान्य जनतेला अप्रुप वाटतं. म्हणुन कुणी काहीही म्हणत असेल त्या अफवा,लोक मात्र पंकजाताईच्या नेतृत्वाच्या पाठीमागे खंबीरपणे उभा रहाताना दिसतात.

## कन्नडमध्ये खैरे बाबा चालणार की भुमरे मामा

**मनोज जरांगे यांचे मावळे काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लागले लक्ष**





आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** सध्या कन्नड तालुक्यामध्ये लोक सभेची रणधुमाळी चांगलीच तापु लागली आहे रखरखत्या उन्हात सुद्धा प्रचाराचा जोर धरू लागला आहे मात्र हुशार कार्यकर्ते मात्र घरात कुलच्या हवेत फेस बुक व हॉटसअप वर मोठ मोठ्या गप्पा हाणतांनी दिसुन येत आहे .

मागील लोकसभे वेळी चंद्रकांत खैरेची जमेची बाजु होती परंतु कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी ऐन वेळी उडी घेतल्याने खैरेची चांगलीच धोबी पछाड झाली या मुळे जलील यांचे मात्र नशीब फळफळेले व त्यांनी विजय खेचुन आनला जलील यांना मुस्लीम बांधव व बंचीतचा पाठींबा मिळाला या वेळी मात्र वंचीत जलील पासुन लांबच दिसुन येत आहे. हर्षवर्धन जाधव यांना कन्नड, वैजापुर, गंगापुर येथुन मराठा समाजाचा चांगलाच प्रतिसाध दिला मात्र संभाजीनगर शहरातुन पुर्व, पच्छिम, मध्य मध्ये फुसका बार निघाला या मुळे पिछाडी वर राहील याचा फडका खैरेना चांगलाच बसला आता 2024 मध्ये उभाटा व शिंदे गटाचा सामना रंगतदार होतांना दिसन येत होता मात्र पुन्हा हर्षवर्धन जाधव व इम्तीयाज जलील मैदानात असल्याने चित्र बदलते का ? या कडे सर्वाचे लक्ष लागले आहे तालुक्याती मराठा समाजाला आरक्षणाच्या नावाने झुलवत ठेवल्याने मनोज जरांगे पाटलाचे मावळे काय भुमिका घेणार हे ही बघणे तितकेच महत्वाचे आहे आता संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे हे पैठण तालुक्यातील असल्याने त्यांचा कन्नड तालुक्यात किती जम बसतो हे पण बघावे लागेल. म्हणुनच कन्नड मध्ये खैरे बाबा चालणार की भुमरे मामा तसेच हर्षवर्धन जाधव इम्तीयाज जलील करणार का करीष्मा तसेच मनोज जरांगे पाटलांचे मावळे काय निर्णय घेणार या कडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

## जनतेच्या बळावरच जालना शहरासह जिल्ह्याचा कायापालट करू शकलो : रावसाहेब दानवे

**मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे धडाक्यात उदघाटन**

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** जनता जनार्दनाने एक- दोन नव्हे तर तब्बल पाच वेळा आपल्यावर विश्वास दाखवून लोकसभेत पाठवले. केंद्र आणि राज्यात सत्ता येताच मतदारसंघात चारही बाजूंनी जोडणारे पक्के रस्ते, रेल्वेचे विद्युतीकरण, पिटलाईन, परराज्यातील भाविक व नागरिकांना स्वतंत्र रेल्वे गाड्या, आय.सी. टी.कॉलेज, ड्रायपोर्ट, जालना शहरातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना, असा चौफेर कायापालट करू शकलो. अशा भावना केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी आज व्यक्त केल्या. तथापि आपल्या विकासाचे मूल्यमापन करत कमळ निशाणी समोर मतदान करून पुन्हा एकदा आपल्याला संधी द्यावी, असे आवाहनही ना. दानवे यांनी आज केले.

जालना लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे मामा चौक परिसरात गुरुवारी ( ता. 02) धुमधडाक्यात उद्घाटन झाले. याप्रसंगी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष, माजी आ.अरविंदराव चव्हाण, रिपाइंचे मराठवाडा अध्यक्ष ॲड. ब्रम्हानंद चव्हाण,भास्करराव पाटील दानवे,राजेश राऊत,रामेश्वर भांदरगे, अशोक पांगारकर, सिद्धिविनायक मुळे, अतिक खान, राजेश सोनी, अर्जुन गेही, विजय कामड,, राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, आण्णासाहेब चित्तेकर, प्रभाकर हंडे, कपिल दहेकर, भागवत बावणे, धनराज काबलिये, सतीश जाधव, शशीकांत घुगे, विशाल बनकर, भागवत बावणे,सोपान पेंढारकर, अमोल धानुरे, संध्याताई देठे, शुभांगी देशपांडे,



अरूणा जाधव, रवी अग्रवाल, राजेंद्र भोसले, अमोल करंजेकर, आदींची उपस्थिती होती. माजी आ. अरविंदराव चव्हाण यांनी आपल्या खास शैलीत "जालना बदल रहा है" याचे सर्वस्वी श्रेय हे ना. रावसाहेब पाटील दानवे यांना जात असून त्यांच्या विकास कामांची पुस्तके प्रकाशित होतील असे सांगून ना. दानवे यांना पुन्हा एकदा विजयी करावे असे आवाहन अरविंदराव चव्हाण यांनी केले.

ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यावेळी म्हणाले, सर्व जाती -धर्मातील जनतेला मोदी सरकारने विकासाच्या प्रवाहात आणले असून ना. रावसाहेब पाटील दानवे यांना पुन्हा एकदा मत देऊन विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. राजेंद्र भोसले यांनी तर शिवराज जाधव यांनी आभार मानले. यावेळी उद्योजक, व्यापारी, यांच्या सह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते , महिला व शहरवासीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .महिला काँग्रेसच्या माजी जिल्हाध्यक्षा तथा ज्येष्ठ समाजसेविका विमलताई आगलावे यांनी आज प्रचार कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांच्या समवेत अशोकराव आगलावे, वैशाली बोडखे, दिपाली पांगारकर आदींचा समावेश असून त्यांचे यावेळी स्वागत करण्यात आले.

# शेतकऱ्यांसह कष्टकरी कामगारांना देशोधडीला लावणाऱ्या भाजपा सरकारला धडा शिकवा : डॉ. कल्याण काळे

## मोदी सरकार हद्दपार करण्याचा कामगार मेळाव्यात एकमुखी निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** केंद्रातील भाजपा सरकारच्या नियोजन शुन्य कारभारामुळे देशातील शेतकरी आणि कामगार देशोधडीला लागले आहेत. मालाला हमीभाव नसल्याने शेतकरी चिंतेत असून जटील कायदे अस्तीत्वात आणून कामगारांना देखील अडचणीत आणण्याचा प्रयत्न केंद्रातील मोदी सरकारने केला आहे. या दळभद्री सरकारला या निवडणूकीत धडा शिकवण्याचे आवाहन महाविकास (इंडिया) आघाडीचे जालना लोकसभेचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांनी येथे बोलतांना केले.आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्ताने जालना येथे काल बुधवारी सिटू व शेतमजूर युनियनच्या वतीने जालना येथील नुतन विद्यालयात कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कॉम्रेड अण्णा सावंत होते. या



मेळाव्यात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी आ.कैलास गोरंट्याल, राम सावंत ,अविनाश कव्हळे, सीपीएमचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड मारुती खंदारे, सिटूचे जिल्हा अध्यक्ष मधुकर मोकळे, सरिता शर्मा आदिंची उपस्थिती होती. आ.कैलास गोरंट्याल यावेळी बोलतांना म्हणाले की, मोदी सरकारच्या काळात सर्व सामान्य जनता महागाईमुळे होरपळून गेली आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार यांच्या संदर्भात केंद्रातील सरकार सातत्याने दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे सर्वच घटक केंद्र सरकारच्या कारभारावर तिव्र नाराज असून ही नाराजी ते मतपेटीतून निश्चीतपणे व्यक्त करतील असा विश्वास आ. गोरंट्याल यांनी यावेळी व्यक्त केला. या मेळाव्यात कामगारांच्या प्रश्नावर विस्तृत चर्चा करण्यात आली. मोदी सरकार कामगार ,शेतकरी आणि शेतमजूर विरोधी आहे. मोदी सरकारने कामगारांनी संघर्ष करून मिळविलेले कामगार कायदे मोडीत काढले आहेत, तेव्हा आपल्या विरोधी असलेले सरकार हद्दपार करण्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांना मतदान करून निवडून आणण्याचा निर्णय एकमताने मेळाव्यात घेण्यात आला. यावेळी अनिल मिसाळ, आयटकचे कॉ.देविदास जीगे, सीपीआयचे कॉ. प्रल्हाद पडूळ, कांता मिटकरी, साजदा बेगम, कांचन वाहूळ, बाबासाहेब पाटोळे, प्रभाकर कुलकर्णी, हरिचंद्र लोखंडे, संतोष पाटोळे आणि मोठ्या संख्येने कामगार व शेतमजूर हजर होते.

# कामगारांच्या न्यायासाठी लढत राहणार : चंद्रकांत खैरे

## कामगार संघटना संयुक्त कृती समितीचा प्रतिनिधी मेळावा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाची लाईफलाईन असलेल्या वाळूज, बजाजनगर, चिखलठाण, शेंद्रा, बिडकीन, चितेगाव औद्योगिक भागात कामगार उपजीविका भागवतात. यादरम्यान अनेकदा संस्था आणि कामगार यांच्यात समन्वय घडून आणण्यासाठी या कामगार संघटना मदत करते. यापुढेही कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव लढत राहणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना नेते तथा महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी केले. कामगार संघटना संयुक्त कृती समितीचा प्रतिनिधी मेळावा संपन्न झाला. भारतीय कामगार सेना आयोजित मेळाव्यात इंटक, भाकप, मजूर संस्थेसह १२ संघटना एकत्र येत महाविकास आघाडी पाठींबा दिला.

यावेळी शिवसेना उपनेते, भारतीय कामगार सेनेचे उपाध्यक्ष विनोद घोसाळकर यांनी कामगार शक्ति एकत्र आल्याने आता नक्कीच क्रांती होईल असा विश्वास व्यक्त केला. बजाज ऑटो युनिट अध्यक्ष विलास जाधव यांनी मनोगत व्यक्त करून पाठींबा जाहीर केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन भारतीय कामागरे सेनेचे संयुक्त राज्य चिटणीस प्रभाकर मते पाटील यांनी केले. देशात आता




फ्रेंच राज्यक्रांतीची पुनरावृत्ती होणार आहे. ज्यावेळी कामगार ऐकवटतो तेव्हा बदल घडवतो. कामगार हिताचे कायदे बदलून उद्योजक आणि भांडवलदाराच्या हिताचे कायदे हे सरकार अआणणार आहे. त्यामुळे आता सत्ता बदल होणार असल्याचे मते पाटील यांनी सांगितले. यावेळी शिवसेना मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, अभियंता सेनेचे प्रवीण जाधव, युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, अभय टाकसाळ, लक्ष्मण सकरोडकर, दामोदर मानकापे, अजय भवळकर, मंगला ठोंबरे, निकम, डॉ. गोपाळ बचिरे, उपजिल्हाप्रमुख राजू इंगळे, बाप्पा दळवी, सचिन गरड, सागर शिंदे, विलास जाधव, समीर कुरेशी, बाळासाहेब कारले, महेंद्र खोतकर, शिवाजी तुरटवर, शिवाजी अपरे आदींसह कामगार संघटना पदाधिकारी आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# चंद्रकांत खैरेंच्या कन्येचा थेट अमेरिकेतून हायटेक प्रचार

## प्रचार दौरे, सोशल मीडिया, महिला पदाधिकारी यांच्याशी संपर्क

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाविकास आघाडीचे



उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचाराला वेग आला आहे. यामध्ये महाविकास आघाडी, शिवसेना पदाधिकारी मेहनत घेत आहे. मात्र यादरम्यान खारीचा वाटा उचलण्यासाठी चंद्रकांत खैरेंच्या कन्येचा थेट अमेरिकेतून हायटेक प्रचार सुरू झाला. प्रेरणा खैरे - अरलीकट्टी यांचे सासर कर्नाटकातील धारवाड असलं तरी त्यांचे पती बसवराज अरलीकट्टी हे अमेरिकेत नोकरी करतात. प्रेरणा या वास्तुविशारद असून त्या आता प्रचाराला येऊ शकल्या नाही. मात्र त्यांनी थेट अमेरिकेतुन प्रचार सुरू केला आहे.

# शॉर्टसर्किट झाल्याने किराणा दुकान जाळून खाक

## सुमारे २६ लाखांचे नुकसान : शिरूरच्या टाकळी हाजीतील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील सागर किराणा स्टोअर्स या दुकानाला आग लागून मोठ्या प्रमाणात किराणा माल व दुकानातील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले असून दुकानातील जवळपास सर्वच साहित्य जाळून खाक झाले आहे.या दुर्दैवी घटनेत सुमारे सव्वीस लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. या घटनेबाबत दुकानाचे मालक दत्तात्रय नानाभाऊ कांदळकर यांनी टाकळी हाजी पोलिसांत रीतसर माहिती दिली आहे. कांदळकर यांच्या दुकानात गुरुवारी पहाटेचे सुमारास शॉर्ट सर्किट झाल्यामुळे आग लागली अशी माहिती मिळाली. टाकळी हाजी गावातील मळगंगा मंदिरात पालखी जवळ असलेले भक्त जयसिंग शिंदे यांना धुर दिसून आल्याने त्यांनी त्या दुकानाचे शटर उघडण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही वीजेचा धक्का बसला. त्यांनी शेजाऱ्यांना आवाज देवून मदतीचे आवाहन केले. आगीच्या ज्वाला मोठ्या प्रमाणात पेटल्यामुळे शेजारीच झोपलेले कांदळकर कुटुंबास जाग आल्याने ही घटना त्यांच्या निदर्शनास आली. परंतु काही करण्याच्या आधीच सगळे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. दुकानातील सर्व किराणा साहित्य, फ्रीज,दुकानात लावलेली मोटासायकल तसेच किचन व त्यातील सर्व भांडी व साहित्य तसेच त्यांचे महत्वाचे



कागदपत्र जळून खाक झाल्याचे दुकानदार दत्ता कांदळकर यांनी सांगितले. त्यांचे कुटुंब दुकानाच्या शेजारील खोलीत झोपलेले होते त्यामुळे सुदैवाने या घटनेत जीवित हानी टळली. घटनेची माहिती मिळताच टाकळी हाजी चे माजी सरपंच दामुअण्णा घोडे,पोलीस पाटील शोभा मंदिलकर, विनोद बोखारे,मयुर मंदिलकर,संतोष गावडे, दत्ता गावडे,अशोक कांदळकर,विक्रम घोडे,निकीता गावडे,सागर कांदळकर हे तात्काळ घटनास्थळी आले.त्यांनी आग विझविण्यासाठी यावेळी शर्थीचे प्रयत्न केले. तर शिरूरचे माजी आमदार पोपटराव गावडे यांनी भेट देत तहसीलदारांशी संपर्क करून पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी केली.महावितरणचे टाकळी हाजी शाखा अभियंता राजेंद्र इंगळे,तलाठी ज्ञानेश्वर चौधरी, ग्रामसेवक राजेंद्र खराडे,यांनी या घटनेचा पंचनामा केला आहे. दुकानाचे मालक दत्तात्रय कांदळकर यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम व अत्यंत गरीबीची असून त्यांना स्थानिक पातळीवर देखील नागरिकांनी शक्य ती अधिकाधिक आर्थिक मदत करावी असे आवाहन करीत आहे. टाकळी हाजी येथील मळगंगा मंदिर व परिसरात विजेच्या खांबाची उंची कमी आहे. विजेच्या खांबांची उंची वाढवावी. तारांचे जाळे कमी करावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहिवासी असलेली अल्पवयीन मुलगी एका ठिकाणी आपल्या मित्रासोबत उभी असताना त्यास आरोपी राहुल काळू थोरात व किरण राजू शिंदे हे घटनास्थळी आले व त्यांनी फिर्यादी मुलीच्या मित्रास मारहाण करून त्यास पळवून लावून तिच्याकडुन शरीर सुखाची मागणी केली व 'ती'," पूर्ण केली नाही तर तुझ्या आई वडिलांना सांगून देऊ" अशी धमकी दिल्या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. मुले आणि मुली वयात येत असताना किंवा आल्यावर त्यांच्याकडून नकळत काही चुका घडत असतात.त्याचा गैरफायदा घेत काही असामाजिक तत्त्व या मुली अथवा मुलांच्या चुकांचा गैरफायदा घेत त्यांच्यावर अतिप्रसंग करण्याच्या घटना समाजाला काही नव्या नाही. एका अल्पवयीन मुलीच्या बाबतीत घडली असून या प्रकरणी एका अल्पवयीन मुलीने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यातील आरोपी राहुल काळु थोरात व किरण राजू शिंदे दोघेही रा.टाकळी रोड कोपरगाव यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मंगळवार दि.३० मे रोजी रात्री ०८ वाजेच्या सुमारास आपण व आपला मित्र याचे सोबत अंबिकानगर कमानींजवळ उभे असताना त्या ठिकाणी वरील आरोपी राहुल थोरात व किरण शिंदे हे आले व त्यांनी फिर्यादीच्या मित्रास मारहाण केली व त्यास पळून जाण्यास भाग पाडले.व त्यांनी फिर्यादी मुलीचा हात धरून तिला अंधारात ओढत नेले व फिर्यादीकडे शरीर सुखाची मागणी केली व "तसे न केल्यास आपण हि घटना तुझ्या आई व वडिलांना सांगून देऊ" अशी धमकी देऊन तिच्याशी असभ्य वर्तन केल्याप्रकरणी तिने कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# जनतेला लुटणाऱ्या भाजपाला पाडावे लागेल : डॉ. कल्याण काळे

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शहरात काल दिनांक 1 मे रोजी इंडिया आघाडी व महाराष्ट्र महाविकास आघाडी चे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते.
या प्रसंगी या उपस्थित असलेल्या जनसमुदायाला संबोधित करताना उमेदवार डॉ कल्याण काळे यांनी केंद्र सरकारच्या ध्येय धोरणावर टीकास्त्र सोडले.लोकशाही वाचवण्यासाठी व महागाईच्या नावाने सर्व सामान्य जनतेला लुटणाऱ्या भाजपाला सत्तेपासून खाली पाडावे लागेल. केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात शेतकरी कामगार रस्त्यावर उतरला आहे. फुलंब्री शहर माझं घर आहे, याची जबाबदारी फुलंब्री शहरातील नागरिकांवर देत आहे, मला फुलंब्रीतुन 100% टक्के मते द्यावी.
स्वातंत्र्य पुर्व काळात ब्रिटिशांविरुद्ध लढलो आता भारतीय जनता पार्टी च्या विरोधात लढायाचे आहे. केंद्र सरकारच्या जीएसटी धोरणामुळे सर्व सामान्य व्यापारी मेटाकुटीला आला आहे. देशातील सत्ता बदल झाल्यास तर राज्यातील बदल होणार आहे. भारतीय जनता पार्टी च्या उमेदवारा विरुद्ध जनता आहे असे कल्याण काळे यांनी सांगितले.
यावेळी विलास औताडे यांनी सांगितले की, भाजपा कडे वांशिग मशीन आहे जे दरोडेखोर भ्रष्टाचारी आहे त्यांना भारतीय जनता पार्टीत प्रवेश दिल्यास त्यांच्यावरील आरोप मुक्त होतात व क्लीन चिट दिली जाते.
लोकशाही वाचवण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार म्हणून डॉ कल्याण काळे यांना निवडून द्यावे, केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात शेतकरी कामगार उतरला आहे. तसेच शिंदे शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र ठोंबरे यांनी सांगितले की, आम्हाला अयोध्येतील राम मंदिराशी काही घेणे देणे नाही आमचं फुलंब्रीतील राम मंदिर बरा आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फुलंब्री तालुक्यातील मंदिरासाठी 10 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता तो निधी भाजपाच्या आमदारांनी पळवला. मंदिरांचे निधी पळवणार्यांना लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पाडा आणि महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून डॉ. कल्याण काळे यांना निवडून आणा असे राजेंद्र ठोंबरे यांनी सांगितले.
या प्रसंगी महाराष्ट्र राज्य काँग्रेस सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, कन्नड चे माजी आमदार नामदेव पवार, आम आदमी पार्टी औरंगाबाद जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष फैसल खान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पाथ्रीकर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष संदीप बोरसे, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे सोमिनाथ करपे, जेष्ठ नेते अशपाक पटेल, अजगर पटेल काॅग्रेस शहराध्यक्ष मुदस्सर पटेल, शिवसेना विधानसभा संघटक अक्षय खेडकर, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख राजेंद्र ठोंबरे, विश्वास औताडे, शिवसेना शहरप्रमुख जमीर पठाण, तालुका उपप्रमुख अय्युब पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष अझहर पटेल माजी नगरसेवक आसिफ पटेल पत्रकार संजय मोरे, महहमु पटेल, मोबीन पाशा, मुमताज काझी, जमीर पठाण, जलींदर शेंडके, समाधान कुडके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आनंद ढोके समाजवादी पक्षाचे शहराध्यक्ष अबरार खान नसीम खान, देविदास ढंगारे उमेश दुतोंडे यांच्या सह आदींची उपस्थिती होती.

# उपजिल्हा रुग्णालय नाही मिळाले, किमान ट्रामा सेंटर तरी धर्माबादला होणे गरजेचे!

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरात उपजिल्हा रुग्णालयाची मागणी अनेक वर्षापासूनची आहे. जी आजतागायत पूर्ण होऊ शकलेली नाही. पण शहरातील तेलंगाना राज्यांशी जोडणारे आद्ययावत झालेले रस्ते व होणारे अपघात या पार्श्वभूमीवर अपघातग्रस्त रुग्णांना तात्काळ उपचार मिळावे यासाठी किमान धर्माबादला ट्रामा सेंटर युद्धपातळीवर सुरू करावे अशी मागणी धर्माबाद वासियांकडून होत असून यासाठी या भागाचे आमदार राजेश पवार यांनीही लक्ष केंद्रित करण्याची गरज येऊन ठेपली आहे. प्रत्येक अधिवेशनात धर्माबादला उपजिल्हा रुग्णालय मिळाले पाहिजे अशी मागणी होते . सरकारं कोरडे आश्वासन देऊन मोकळे होते आणि लोकप्रतिनिधी त्याचा प्रसार करून प्रसिध्दी करून घेतात पण प्रत्यक्षात जनतेच्या पदरी मात्र उपेक्षाच उरत आहे.
धर्माबाद तालुक्यातून तेलंगणा राज्याला जोडणारे तीनही बाजूचे रस्ते आद्ययावत झाले आहे. जन्मभूमी ते कर्मभूमी,बासर तीर्थक्षेत्र ते बिलोली कडे जाणारा रस्ता व कारेगाव फाट्याकडून बासर तीर्थक्षेत्राला जोडणारा रस्ता हे सर्वच रस्ते अगदी अद्ययावत झाले असून वाहने सुसाट वेगाने जात आहेत. त्यामुळे वरचेवर अपघाताची शृंखलाच सुरू झाली असून गेल्या तीनच दिवसात दोन जणांना आपला जीव गमवावा लागला असून पाच जण अत्यवस्थ आहेत.
अत्यवस्थ असलेल्या रुग्णांना तात्काळ सेवा मिळण्यासाठी ट्रामा सेंटरची अत्यंत गरज असते! ट्रामा सेंटरमध्ये घायाळ झालेल्या रुग्णांना तात्काळ इलाज केला जातो. यामध्ये एक इमर्जन्सी वार्डही असतो आणि अपघातात विशेषतः डोक्याला मार लागण्याची व हाडे तुटण्याची सर्वात जास्त भीती असते. त्यामुळे मेंदू रोग तज्ञ व अस्थिरोग तज्ञ ट्रामा सेंटरला असतातच. त्याशिवाय सदरील ड्रामा सेंटर मध्ये उच्चशिक्षित डॉक्टर, सर्जन, नर्स आदी कार्य तत्पर असतात. औषधी विभागही अद्ययावत असून ट्रामा सेंटर मधील औषधी विभागात सर्व प्रकारचे औषधी रुग्णांना मोफत मिळतात. ट्रामा सेंटरचे आद्ययावत असे फिरते वाहन असते. त्यामुळे अपघातग्रस्त रुग्णांना तात्काळ ट्रामा सेंटर मध्ये ऍडमिट करून त्यांच्यावर उपचार केल्यास त्यांचे प्राण वाचण्याची शक्यता असते. उपरोक्त पार्श्वभूमीवर धर्माबादला उपजिल्हा रुग्णालय नाहीतर नाही किमान ट्रामा सेंटर तरी व्हावे अशी मागणी संपूर्ण नागरिकांतून होत असून या बाबीकडे आमदार राजेश पवार यांनी विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचेही बोलल्या जात आहे.

ही मागणी अतिशय वास्तव असून लवकरच मी त्या धरतीवरचा प्रस्ताव शासनाकडे व आमदार आणि खासदार यांच्याकडे पाठवणार असून ट्रामा केअर सेंटर झाल्यास अनेक अपघातग्रस्त रुग्णांचे प्राण वाचू शकतात अशा प्रतिक्रिया त्यांनी दिल्या . धर्माबाद वासियासाठी ट्रॉमा केअर सेंटर अतीशय उपयुक्त ठरेल असे ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर वेणूगोपाल पंडित म्हणाले .

रस्ते अपघाताची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे आणि गंभीर जखमी रुग्णावर उपचार करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा साधन सामुग्री नसल्यानें नांदेड किंवा निझामाबाद शिवाय पर्याय उरला नाही यात त्या ठिकाणी पोहचण्यास वेळ लागत आहे त्यामुळे जनहितार्थ अतीशय योग्य असणाऱ्या या मागणीवर लोकप्रतिनिधी नी आवाज उठवून ती मंजुर करून घ्यावी . योगायोग म्हणजे विधानसभा क्षेत्राचे सदस्य सताधारी पक्षांचे आहेत . सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी व्हावा अशी अपेक्षा सुज्ञ नागरिकांतून व्यक्त केली जात आहे



आधुनिक केसरी न्यूज

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कोल्हापूर जिल्हाध्यक्ष बाजीराव फरकाटे व पांडुरंग फिरंगे यांनी कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी चे उमेदवार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांची भेट घेऊन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयाची सूट द्यावी या मागणीचे निवेदन देण्यात दिले .यावेळी महाराजांनी, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या मागण्यांसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि लोकसभेत पत्रकारांशी संबंधित प्राधान्याने प्रयत्न करू अशी ग्वाही दिली .

# नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीचे संचालक डॉ. ए.एच. शेख यांना 'राष्ट्रीय प्रतिभा सम्मान'

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि. २८ एप्रिल २०२४ रोजी 'तीन मुर्ती भवन', दिल्ली येथे झालेल्या एका विशेष समारंभात सिनेअभिनेत्री व नृत्यांगन सुधा चंद्रन यांच्या हस्ते नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीचे संचालक आयुर्वेदतज्ञ डॉ. ए. एच. शेख यांना 'राष्ट्रीय प्रतिभा सम्मान'या पुरस्काराने सन्मानित केले आहे. विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द करणाऱ्या ३ व्यक्तींना प्रत्येक राज्यातुन या विशेष समारंभासाठी आमंत्रित केले होते. या प्रसंगी आर. जे. आरती मल्होत्रा, डॉ. तिलक तर्नवट (संचालक, गोल्डन स्पॅरो), स्वामी विरेंद्रानंद महाराज, स्वामी राजेश्वरानंद, सोनम मोनदन (प्रमुख, थरंगु वज्र विद्या संस्था, सारनाथ) हे उपस्थित होते. वैद्याकिय क्षेत्रात अतुलनिय कार्य केल्या बद्दल डॉ. ए. एच शेख यांना सन्मानित केले आहे.






आधुनिक केसरी न्यूज

अकोला ता . बदनापूर येथे भगवानगडाचे महंत ह . भ . प . नामदेव महाराज शास्त्री यांच्या उपस्थितीमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास अर्जुन खोतकर यांनी उपस्थिती लावली तसेच शास्त्री महाराजांनी अर्जुन खोतकर यांचे स्वागत करत आशीर्वाद दिला . अर्जुन खोतकर यांनी भगवान गडाच्या विकासासाठी ५,००,००० पाच लाख रु देणगी दिली . यावेळी संपर्कप्रमुख पंडीत भूतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, भगवान गडाचे ट्रस्टी राजेंद्र राख, बळीराम गीते रामदास नाना, एकनाथ जयभाये, गजानन गीते, ब्रम्हा वाघ आदी दिसत आहे .

# अपघातग्रस्तांच्या मदतीला धावले मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील शिवराई येथील ज्ञानेश्वर औटे मिनाबाई औटे हे वैजापुर लग्नाला गेलेले होते लग्न समारंभ पार पाडुन घराकडे परतत असतांना मोटारसाईकलचा तोल गेल्याने दोघांनाही गंभीर दुखापत झाली हा अपघात हसनखेडा येथे झाला त्या ठिकानी बघ्याची गर्दी होती मात्र मदत कोन्हीच करत नव्हते
यावेळी शिवुर बंगला येथून उदयोजक मनोज पवार कन्नडला परतत असताना रोडच्या कडेला लोक जमा झालेले दिसताच उद्योजक मनोज पवार यांनी आपली गाडी थांबवून विचारपुस केली याप्रसंगी पवार यांनी अपघात झालेला अपघातग्रस्तांना स्वतःच्या गाडीमध्ये बसवून रुग्नलयात रवाना केले या मुळे माणुसकीचे दर्शन दिसुन आले या मुळे पवार यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

# मोदी सत्तेत केवळ भांडवलदारांनाच पोसण्याचे काम

## काँग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक मा. आ. सय्यद मुज्जफर हुसैन यांची टिका

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** केंद्रातील मोदी सरकाराच्या सत्ता काळात सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय न घेता केवळ भांडवलदारांनाच पोसण्याचे काम झाले असल्यामुळे सरकार विरूध्द देशभरात मोठी चिड निर्माण झाली आहे. त्यामुळे यावेळी या नाकर्त्या सरकारला सत्तेतून घालविण्यासाठी सर्वांनी संघटीतपणे प्रयत्न करावा असे आवाहन कॉंग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक मा.आ. सय्यद मुज्जफर हुसैन यांनी येथे बोलतांना केले आहे.



जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास (इंडीया) आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ काल बुधवार दि.1 मे रोजी जालना शहरात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी आ. कैलास गोरंट्याल, मौलाना आझाद महामंडळाचे मा.संचालक इब्राहीम पठाण,शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष शेख महेमूद, राकॉंचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे, ॲड. सय्यद अक्रम, राजेंद्र जाधव, बदर चाऊस, रऊफ देशमुख, महाविर ढक्का, किशोर गरदास, डॉ. विशाल धानूरे, अब्दुल बासेद कुरेशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना हुसैन म्हणाले की, भाजपा सरकारच्या काळात देशात समाजा-समाजामध्ये विष कालवण्याचे काम केले आज आहे. तर दुसरीकडे कॉंग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून सामान्य जनता, शेतकरी, बेरोजगार, कामगार आणि पिडीत लोकांच्या व्यथा जाणून घेण्याचे काम केले आहे. डॉ. कल्याण काळे हे लोकसभेत निवडूण आल्यास आ.कैलास गोरंट्याल हे महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रीमंडळात कॅबीनेट मंत्री असतील असा विश्वास देखील हुसैन यांनी यावेळी व्यक्त केला. आ. कैलास गोरंट्याल म्हणाले की शहरातील प्रत्येक भागात कॉंग्रेसच्या तत्कालीन नगराध्यक्षा सौ. संगीता गोरंट्याल यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासाची कामे करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील जनता कॉंग्रेस पक्षाच्या पाठीमागे खंबीरपणे उभी असून महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांचा विजय निश्चीत असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तत्पुर्वी दुःखी नगर भागातील जमाअते ईस्लामी हिंदच्या जिल्हा कार्यालयास मा.मुज्जफर हुसैन यांनी भेट देवून पदाधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चा केली तसेच बुऱ्हाणनगर मधील बागवान बिरादरीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांच्याशीही चर्चा केली. यावेळी मुज्जफर हुसैन यांचे ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेख महेमुद यांनी केले. संचलन परवेज आलम यांनी तर शेवटी आभार जावेद आली यांनी मानले.



# रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन युवकांचा भाजपात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन जालना विधानसभा मतदारसंघातील देवमूर्ती येथील असंख्य युवकांनी जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला व जालना लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार रावसाहेब पाटील दानवे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला. पक्ष प्रवेश करणाऱ्यांमध्ये काकासाहेब जाधव, विजय चौधरी, संजय मिसाळ, बालाजी बांडे, सुधाकर चौरे, योगेश चव्हाण, प्रकाश यादव, विलास फुलझाडे, यशवंत मिसाळ, जनार्धन फुलझाडे, गोपीनाथ धोंडे, भागवत फुलझाडे, शिवा मिसाळ, जगन फुलझाडे, प्रल्हाद फुलझाडे, कैलास फुलझाडे, परमेश्वर फुलझाडे, छत्रगुण फुलझाडे, बाबु गायके, दत्ता फुलझाडे, ज्ञानेश्वर फुलझाडे, गजानन वाघमारे, संतोष फुलझाडे, विजय फुलझाडे, दिपक मिसाळ, अर्जुन फुलझाडे, प्रसाद फुलझाडे, राजु राऊत, गणेश चौरे, शंकर चौरे, शिवाजी फुलझाडे, अक्षय जावळे, ऋषीकेश फुलझाडे, शाम बकाल, विक्की सातपुते, बद्री गायके, नामदेव मिसाळ, गजानन फुलझाडे, हरीओम जाधव, कृष्णा फुलझाडे, अनिल जाधव, शुभम फुलझाडे, राम बकाल, अर्जुन फुलझाडे, आकाश फुलझाडे, गणेश चौरे, पवन फुलझाडे, मंगेश मिसाळ, रुपेश गायके, रामेश्वर घोडके, राम फुलझाडे, ज्ञानेश्वर फुलझाडे, गणेश फुलझाडे, अर्जुन फुलझाडे, सुनिल मिसाळ, कृष्णा मिसाळ, शरदा फुलझाडे, सौरभ फुलझाडे, गौतम म्हस्के, राजु म्हस्के, बाबासाहेब फुलझाडे, अर्जुन मिसाळ आदींचा समावेश आहे.

दादांच्या नेतृत्वात जालना जिल्ह्याला विकासाला नवसंजीवनी लाभली आहे. त्यांच्या माध्यमातून रेल्वे, रस्ते, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, नियमित पाणीपुरवठा या सर्व प्रश्न सुटून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत आहे. ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विकसाभिमुख दूरदृष्टी व तळमळ हे पाहता भारतीय जनता पार्टीच्या सर्वसमावेशक विकासकार्यात आम्ही भाजपासोबत जोडल्या जात आहोत असेही प्रवेश करताना युवकांनी सांगितले.

# तुतारीचं नाव फक्त बारामतीतच नाही तर बाहेरील देशात ही : अमोल साबळे

## शरद पवार यांचा अमोल साबळेंकडून संविधानाने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठींबा दर्शविलेला आहे.त्यानुसार महाराष्ट्रातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते महाविकास आघाडीचा प्रचार करताना दिसत आहेत.बारामती लोकसभा मतदारसंघातूनमाजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या कन्या व विद्यमान खासदार सुप्रियाताई सुळे ह्या उभ्या आहेत.त्यांचा प्रचार करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सुद्धा मैदानात उतरलेले आहेत. निरा ता.पुरंदर येथील सामाजिक कार्यकर्ते व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी सुद्धा चांगलीच कंबर कसलेली आहे.ते स्वतः आपल्या कार्यकर्त्यांसह सहभागी होत आहेत.निरा शहरात माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांची जाहीर सभा विद्यमान खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या प्रचारार्थ संपन्न होत असताना अमोल साबळे यांनी शरद पवार यांना भारतीय संविधानाचे पुस्तक देत त्यांचा सत्कार केला.यावेळी मंचावर खासदार सुप्रियाताई सुळे,आमदार संजय जगताप,रोहित पाटील,नितेश कराळे गुरूजी,सक्षणा सलगर,डॉ.नितीन सावंत,माजी आमदार शेवाळे बापू,संभाजीराव झेंडे,माणिकराव झेंडे,सुदामआप्पा इंगळे,दत्ताआबा चव्हाण व इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी अमोल साबळे यांनी शरद पवार यांचा संविधान देऊन विशेष सत्कार केला.

काही महिन्यांपूर्वीच शरद पवार आणि सुप्रियाताई सुळे हे निरेत आले असता त्यावेळी सुद्धा अमोल साबळे यांनी शरद पवार आणि सुप्रियाताई सुळे यांचा भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन सत्कार केला होता.परंतु यावेळी भारतीय संविधानाचे पुस्तक देत सत्कार केला. या सत्काराबद्दल शरद पवार यांनी सुद्धा अमोल साबळे यांचा हात हातात घेत एकप्रकारे धन्यवादच मानले.पुरोगामी विचारांची कास आयुष्यभर सोबत घेऊन जगणाऱ्या शरद पवारांचा संविधान देऊन सत्कार करता आल्याने अमोल साबळे यांनी सुद्धा विशेष समाधान व्यक्त केलेले आहे.अमोल साबळे यांच्या कडुन गेली अनेक वर्षांपासून संविधान प्रचार आणि प्रसारासाठी कार्य केले जात आहे.आज निरा येथे जाहीर सभेतून शरद पवार यांना संविधान देताना समोर जनसमुदाय ही मोठ्या संख्येने उपस्थित होता.राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल साबळे हे निरेच्या पंचक्रोशीत काम करत असून पक्षाने महाविकास आघाडीसोबत जाण्याचा निर्णय घेतल्या पासून अमोल साबळे हे बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवार सुप्रियाताई सुळे यांचा प्रचार करत आहेत.

निरा येथील सभेत सुद्धा अमोल साबळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अमोल साबळे म्हणाले की,संविधानाच्या रक्षणासाठी,लोकशाहीच्या सन्मानासाठी आरपीआय मैदानात उतरलेली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांनी ४८ जागांना तसेच इंडिया आघाडीला पाठींबा दिला.निरा शहरात बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रियाताई यांच्या प्राचारार्थ झंझावात पाहायला मिळत आहे.आज असं वाटतंय तुतारीच नाव फक्त बारामतीतच नाही तर बाहेरील देशात ही घेतले जात आहे.ही आपली एक लढाई आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले आहे की,हे संविधान कोणत्याही धर्मावर नाही तर मानवतेवर चालतं.१३५ कोटी जनतेला न्याय देण्याची भूमिका बाबासाहेबांनी ठेवली.६७५० जातींना हे संविधान दिलं.मनुवादी लोकांकडून एका जाती धर्मामध्ये संविधानाला गुंडाळून ठेवलं जातं.असं न करता आम्ही आरपीआय आणि सर्व शाहू फुले आंबेडकर चळवळीच्या सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी या तुतारीला मतदान करण्याचे आवाहन केलेले आहे.ताईना बहुमताने निवडून आणू असा विश्वास अमोल साबळे यांनी व्यक्त केला.



# रविदास महाराज मुर्तीची वेरुळ येथे प्राणप्रतिष्ठा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ येथील संत शिरोमणी गुरू रविदास संस्थान येथील मंदिरात संत शिरोमणी गुरू रविदास महाराज मुर्तीची प्राण प्रतिष्ठा विधीवत होम हवन पुजा करुन श्री. १००८ मंहत शांतीदास शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी संस्थानचे सचिव देवीलाल भगोरे यांच्या वतीने संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची मुर्तीची नासिक येथुन आनुन दिली व संत शिरोमणी गुरू रविदास महाराज संस्थान मंदिरात विधीवत होमहवन पुजा त्याच्या परीवार कडुन करण्यात आली. या संत शिरोमणी गुरू रविदास महाराज मुर्तीची प्राण प्रतिष्ठा कर्त्या वेळी संत शिरोमणी गुरू रविदास संस्थान चे अध्यक्ष लक्ष्मण गरोठे, उपाध्यक्ष बन्सीलाल कुचे, गणेश रईवाले,कोषाध्यक्ष रामदास भगुरे, सदस्य सुखलाल गेहरोव, कन्हैयालाल निंभोरे, पुनमचंद शिखरे, धोंडीराम पुसे, शामलाल भगुरे, शिवलाल भेंडे, मोतीलाल श्रावणे, ईश्वर पुसे, राजु बिरसने,दगडू बरथरे, राजु बऱ्हाणपुरे, सुनील इमले, कैलास निंभोरे,रूपलाल शिखरे, सुनिल शिराळे, नंदु चरभरे , प्रकाश सोनवणे, दिपक भगुरे, चिंदाजी निंभोरे, धिरज नुनसे.राम कांकरिया, तसेच महिला लिलाबाई भगोरे, रत्नाबाई शिखरे,पुष्पा शिखरे, लिलाबाई गरोठे, हिराबाई पुसे, रूपाली गरोठे, सरीता भगोरे, राजेश्री भगोरे, सोनल शिखरे, हेमाबाई कांकरिया, किशोर पुसे आदी मान्यवर होते. या संत शिरोमणी गुरू रविदास मुर्ती प्राण प्रतिष्ठा वेळी नासिक, अहमदाबाद, बऱ्हाणपूर, अहमदनगर, जालना, खुलताबाद, कन्नड, गंगापूर, या ठिकाणीहुन मोठ्या संख्येने समाज बांधव यावेळी वेळी उपस्थित होते.

# संशयातून महिलेसह दोघांना जिवंत जाळले

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** १ मे रोजी राज्यात सर्वत्र महाराष्ट्र दिन साजरा केला जात असताना गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील बार्सेवाडा येथे जादूटोण्याच्या संशयावरून महिलेसह दोन जणांना काही गावकऱ्यांनी मिळून जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

जमनी तेलामी (५२), देऊ आतलामी (६०) अशी मृतांची नावे असून याप्रकरणी १५ जणांना अटक करण्यात आली आहे. एटापल्ली तालुक्यातील बार्सेवाडा येथील जमनी आणि देऊ हे दोघे जादूटोणा करीत असल्याचा संशय काही गावकऱ्यांना होता. १ मे रोजी संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास गावकऱ्यांनी एकत्र येत दोघांना अतिशय निर्दयीपणे मारहाण केली. त्यानंतर मरणासन्न अस्वथेत असलेल्या दोघांना ओढत नेत रात्री १० वाजतादरम्यान गावाबाहेरील नाल्यात पेटवून दिले. दुसऱ्या दिवशी उशीरापर्यंत याविषयी कुणालाच माहिती नव्हती.

दरम्यान, पोलिसांना कुणकुण लागताच त्यांनी तपासाची चक्रे फिरवून गुन्ह्याचा उलगडा केला. घटनास्थळी दोघांच्या मृतादेहांचा कोळसा झाला होता. याप्रकरणी गावातील एकूण १५ जणांना अटक करण्यात आली असून आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. आरोपींमध्ये मृत जमनी हीचा नवरा देवाजी तेलामी (६०) व मुलगा दिवाकर तेलामी (२८) यांचा समावेश आहे.

# सुरळीत विद्युत पुरवठ्याअभावी शित उपकरणांचा वापर मंदावला

## विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण : शासकीय निमशासकीय कार्यालयातील कामेही प्रभावित

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** मार्च महिन्याच्या अखेरीस पासूनच यावर्षी कडक उन्हाळा सुरू झाला असून एप्रिल मधे काही प्रमाणात बऱ्याच ठिकाणी अवकाळी पाऊस पडला.यामुळे फायदा कमी होऊन नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले.त्यातच ऐन कडक उन्हाळ्यात सुरू झालेल्या विजेच्या लपंडावाने रिसोड शहरासह खेड्यापाड्यातील नागरिक देखील हैराण झाले आहेत. थोड हवा पाणी आले की विजेचा पुरवठा खंडित होणारच हे आता नित्याचेच झाले आहे. उष्माघातापासून बचाव होण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. अत्यंत महत्वाच्या कामाशिवाय घरातून बाहेर पडू नका,लहान मुलांना तीव्र उन्हामध्ये खेलण्यास जाऊ देऊ नका एवढच नाही तर उष्माघातापासून बचाव होण्याच्या दृष्टीने बावीस एप्रिल पासून शासनाच्या आदेशानुसार शाळांमधून विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली आहे. सतत हवामानामध्ये बदल होत आहेत.उन्हाळा म्हटल की लग्नसराई आली या विजेच्या लपंडावाचा त्रास हा लग्न असलेल्यांना देखील होत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळा पासून नागरिकाना बचाव व्हावा म्हणून घरी बसलेल्या नागरिकांना देखील शीत उपकरणे फ्रिज,कुलर, एसी, पंखा, याचा देखील पूर्णपणे उपभोग घेता येत नसल्याने याचा नाहक त्रास हा लहान मुले,वयोवृध्द यांच्यासह सर्वांनाच सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रकार हे कोणत्या ना कोणत्या कारणाने सातत्याने घडत आहेत. तसेच ग्रामीण भागात सकाळी सहा ते आठ दोन तास विद्युत भारनियमन देखील घेण्यात येते. रात्री अपरात्री बत्ती गुल होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा देखील प्रश्न एरणीवर येत आहे. शेती वापरासाठी असलेल्या विद्युत वाहिन्यांचे कित्तेक वर्षापासून दुरुस्तीचे कामे झालीच नसल्याने अनेक ठिकाणी विद्युत तारा ह्या हाताला लागतील एवढ्या अंतरावर येऊन ठेपल्या आहेत. परिणामी विद्युत पुरवठा खंडित होऊन जनावरांचा, माणसाच्या पिण्याच्या पाण्याची अडचण भासते. विजेच्या लपंडावाचा फटका हा शासकीय, निमशासकीय कार्यालयांबरोबरच घरगुती वापराच्या विद्युत उपकरणांना देखील बसत आहे. एकंदरीतच विजेच्या लपंडावाने तालुक्यातील नागरिक हैराण झाले आहेत. यावर तात्काळ उपाय योजना करून अवेळी खंडित होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी होत आहे.

> असह्य होणाऱ्या या कडक उन्हाळ्यात रात्री बेरात्री विद्युत पुरवठा तासन तास खंडित होण्याचे प्रमाण वाढले असून यामुळे पिण्याच्या पाण्याची तसेच इतर गृह उद्योगांची परवड होत आहे . महावितरण कंपनीने तात्काळ याकडे लक्ष देऊन वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करावा . **डॉ .प्रवीण लड्डा ग्राहक लोणी बू**

# शिर्डीत खासदार कोण ? सत्ताधारी माजी नगरसेवकांचा खा. लोखंडेंना घरचा आहेर

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शिर्डी लोकसभा मतदार संघातील खासदार कोण आहेत? (गेली दहा वर्ष आम्हाला ते पाहायला मिळाले नाही) अशी उपरोधिक मागणी कोपरगाव नगरपरिषदेतील वर्तमान अजित पवार राष्ट्रवादी गटाचे माजी नगरसेवक मेहमूद सय्यद यांनी भरसभेत केल्याने सत्ताधारी गटाचा हा घरचा आहेर असल्याचे मतदार संघात बोलले जात आहे. त्यामुळे शिर्डी लोकसभा मतदार संघात सत्ताधारी गोटात खळबळ उडाली आहे.त्या मागणीची सामाजिक संकेतस्थळावर सर्वत्र उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

कोपरगाव येथे राज्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे व आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते व शिर्डी लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार खा.सदाशिव लोखंडे यांच्या वातूनुकुलीत आलिशान प्रचार कार्यालयाचे उद्घाटन,'कृष्णाई बँक्वेट हॉल' येथील कार्यालयात मोठया उत्साहात करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. सदर प्रसंगी राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे,माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप,शिर्डी लोकसभा मतदार संघाचे बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार व खा.सदाशिव लोखंडे,कोपरगाव नगरपरिषदेचे माजी अध्यक्ष विजय वहाडणे,भाजपचे माजी शहर प्रमुख विनायक गायकवाड,एकनाथ सेनेचे जिल्हा प्रमुख नितीन औताडे,युवा राष्ट्रवादीचे जिल्हा प्रमुख कृष्णा आढाव,माजी नगरसेवक दिनार कुदळे,तालुका प्रमुख रावसाहेब थोरात या शिवाय महायुतीचे अनेक पदाधिकारीं,कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यावेळी एकनाथ सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या बाबतीत मेहमूद सय्यद यांच्या या मागणीस हरकत घेतली व सदर माजी नगर सेवक मेहमूद सय्यद यांना कोणी बोलवले असा सवाल करून ते विरोधी महाआघाडीचे उमेदवार व माजी खा.भाऊसाहेब वाकचोरे यांचे हस्तक असल्याचा आरोप औताडे यांनी केला व त्या संबंधी भ्रमणध्वनीवर असलेला त्यांच्या समवेत असलेला पुरावा माध्यम प्रतिनिधींना दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र मेहमूद सय्यद यांनी त्यास विरोध केला असून आपण राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे आ.आशुतोष काळे यांच्या निमंत्रणावरून आलो असल्याचा जोरदार दावा केला आहे.व माजी खा.वाकचौरे यांचा आपला संबंध नाही असे सुनावले आहे.आपणाला व्यासपीठावरून जोरदार विरोध केल्याने सभेत काही काळ गोंधळ निर्माण झाला होता.अखेर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यात हस्तक्षेप करून त्यांची ओळख करून देऊ असा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे व या वादावर पांघरून घातले असल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान या वादाचा संदर्भ देऊन आ.आशुतोष काळे यांनीही आपल्या भाषणात कोपरगाव तालुक्याने खा.लोखंडे यांना आपल्या तालुक्याने २०१४ च्या निवडणुकीत ५० हजार तर २०१९ च्या निवडणूकीत ४० हजारांच्या असे दोनदा मोठ्या मताधिक्याने निवडून दिले असल्याचे स्मरण करून दिले आहे. मात्र आता मागील प्रमाणे (म्हणजे मतदार संघातील प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही) काम करता येणार नाही.असे म्हणून अप्रत्यक्ष मेहमूद सय्यद यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला आहे. त्यामुळे मेहमूद सय्यद यांना विरोध करणाऱ्यांना अंतर्मुख होण्याचा अनास्था प्रसंग गुदरला आहे.

दरम्यान आ.आशुतोष काळे यांनीही खा.लोखंडे यांच्या कामाबाबद नागरिकांत नाराजी असल्याचे सूतोवाच करून पुढे म्हटले आहे की,"२०१४ ला सेनेचे खा.लोखंडे यांना उमेदवारी मिळविण्यापासून ते निवडून आणण्यापर्यंत जबाबदारी पार पाडली हे संपूर्ण मतदार संघाने पाहिले आहे.(मात्र ते त्या ऋणास किती पात्र झाले हे सांगितले असते तर बरे झाले असते) आमच्या जे पोटात असते तेच आमच्या ओठावर असते त्यामुळे आमचं ठरलं ते ठरलं त्यापासून मागे हटायचे नाही जे ठरलं ते करून दाखवायचं.त्यामुळे आमचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत.तुम्हाला जास्तीत जास्त मतदान घडवून आणतील तुम्ही बिनधास्त रहा असा शेवटी दिलासा देण्याचा व मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी माजी आ.स्नेहलता कोल्हे यांचे बाबत बोलताना नाव न घेता त्यांनी म्हटले आहे की,"मात्र काहींच्या पोटात एक आणि ओठात एक असते ते लोक आजही व्यासपीठावर कुठे दिसत नाही त्यामुळे मला काळजी वाटते तुम्ही पण काळजी घ्यावी असा चिमटा काढण्यास शेवटी ते विसरले नाही.






# रुग्णांना व्याधीमुक्त करण्यासाठीच महाआरोग्य शिबिराचे आयोजन : डॉ. घुले

## १ हजार ३४६ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महाराष्ट्र दिनी नेवासा येथे समर्पण फाउंडेशनच्या सौजन्याने तसेच नेवासा तालुका मेडिकल असोसिएशन व एस एम बी टी हॉस्पिटल धामणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या शिबिरात एकूण १ हजार ३४६ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.होणाऱ्या आजाराला रोखण्यासाठी व रुग्णांना व्याधीमुक्त करण्यासाठीच महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे शिबीराचे आयोजक डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी बोलताना सांगितले. नेवासा येथील बाजारतळ प्रांगणात झालेल्या शिबिराच्या उदघाटन जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष आर बी गायकवाड हे होते तर माजी शिक्षक एस.आर.शिंदे, पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष बापूराव बहिरट,डॉ.भाऊसाहेब घुले,डॉ. राजेंद्र शिर्के,डॉ.लक्ष्मणराव खंडाळे,डॉ.अशोक झरेकर,डॉ. नितीन करवंदे,डॉ. मोहसीन बागवान,डॉ.शंकर शिंदे,अँड. जानकीराम डौले, नगरपंचायतचे प्रशासकीय अधिकारी रामदास म्हस्के, डॉ.शिवतेज दारुंटे,डॉ.रविंद्र दरंदले,डॉ. विजय गाडे, डॉ.शिवाजीराव गोरे, अटलबिहारी वाजपेयी होमिओपॅथीक कॉलेजचे प्राचार्य पंकज दुक्कड, डॉ.प्रमोद देवखिळे,डॉ. नजन, होमिओपॅथीक असोसिएशन चे अध्यक्ष डॉ.गणेश बर्डे, डेंटिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. श्रवण एरंडे, डॉ. राजेंद्र म्हस्के, प्रशांत शिर्के,डॉ. बाळासाहेब आरेकर, डॉ.अर्जुन शिंदे, डॉ.प्रणव जोशी,लॅब असोसिएशनचे अध्यक्ष संजय कर्जुले, डॉ.मनोज फिरोदिया आरोग्य मित्र निवृत्ती जाधव व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी आरोग्य महा शिबिराचे आयोजक व समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांनी आलेल्या मान्यवर व तज्ञ डॉक्टर मंडळींचे स्वागत केले यावेळी बोलताना ते म्हणाले की माऊलींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नेवासेनगरीत महाआरोग्य शिबीराची संकल्पना आज नेवासा मेडिकल असोसिएशन व एस एम बी टी हॉस्पिटल धामणगाव यांच्या योगदानातून साकार होत आहे,रुग्णांना होणारे आजार वाढू नये यासाठी या शिबिराचे आयोजन सर्वांचे सहकार्याने करण्यात आले असल्याचे सांगून त्यांनी महागडे उपचार व शस्त्र क्रिया मोफत कशा करता येईल त्यासाठी आपण प्रयत्न करणार असून नेवासाफाटा येथे जागा उपलब्ध करून ही महागडी ऑपरेशन तेथेच करण्याचा मानस त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांसह डॉक्टर मंडळींचा सन्मान समर्पण फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आला.या प्रसंगी अँड. जानकीराम डौले,डॉ.लक्ष्मणराव खंडाळे,डॉ.सुभाष भागवत यांनी मनोगत व्यक्त करत महाआरोग्य शिबिराला शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समर्पण फाऊंडेशनचे प्रवक्ते पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले तर प्राथमिक आरोग्य केंद्राचे सेवानिवृत्त औषध निर्माता डॉ.संजय सुकाळकर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. महा आरोग्य शिबीर प्रसंगी कान नाक घसा कक्ष, हदयरोग कक्ष, बालरोग कक्ष,स्त्री रोग निदान कक्ष, अस्थिरोग निदान कक्ष, मधुमेह रुग्ण कक्ष यांची स्वतंत्र तपासणीसाठी व्यवस्था करण्यात आली होती या शिबिरामध्येएकुण नोंदणी १३४६ झाली यामध्ये ३४६ रुग्णांची निदान निश्चिती करता आवश्यक तपासणी करण्यात आली.

# महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरेंचा शक्ती प्रदर्शन करत प्रचाराचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** महविकास आघाडीचे शिर्डी लोकसभा मतदार संघाचे उमेदवार माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आमदार शंकरराव गडाख यांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत नेवासा येथे गुरुवारी दि.२ मे रोजी श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला. नेवासा येथे भाऊसाहेब वाकचौरे यांचे आमदार शंकरराव गडाख यांच्या समवेत आगमन झाल्यानंतर त्यांनी हजारो कार्यकर्त्यांच्या समवेत नेवासा नगरीचे गामदैवत श्री मोहिनीराजांचे दर्शन घेतले. शिर्डी लोकसभा मतदान संघाचा विकास होण्यासाठी आम्हाला विजयश्री प्राप्त होऊ द्या असे साकडे त्यांनी श्री मोहिनीराजांना घातले. यावेळी श्री मोहिनीराजांच्या मंदिरासमोर आमदार शंकरराव गडाख,भाऊसाहेब वाकचौरे,शिवसेनेचे जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे नाना,रामदास गोल्हार,हरिभाऊ शेळके,रावसाहेब कांगुणे,मुळा कारखान्याचे उपाध्यक्ष कडुबाळ कर्डीले,रामभाऊ जगताप,लक्ष्मण जगताप, अंबादास लष्करे,तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पटारे,संदीप मोटे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.शोभाताई पातारे, राष्ट्रवादीचे काकासाहेब शिंदे,डॉ. अशोकराव ढगे,आम आदमी पार्टीचे राजू आघाव,अँड.सादिक शिलेदार, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अँड.बन्सी सातपूते,यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी निघालेल्या रॅलीत चौकाचौकात व नेवासा शहरातील मुख्य पेठेत आमदार शंकरराव गडाख व उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांचे फटाक्यांची अतिषबाजीने व्यापारी व सर्वधर्मीय बांधवांनी हार घालून सत्काराच्याद्वारे स्वागत केले.माजी जिल्हा परिषद सदस्य महंमदभाई आतार,रहेमानभाई पिंजारी यांनी मुस्लिम समाजाच्या वतीने सत्कार करत स्वागत केले.यावेळी निघालेल्या रॅलीत नारायण लोखंडे,दिलीप जामदार, दिलीप सरोदे,वकील संघाचे अध्यक्ष अँड.कल्याण पिसाळ सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,माजी नगराध्यक्ष सतीश पिंपळे,नगरसेवक रणजित सोनवणे,राजेंद्र मापारी, संदीप बेहळे,दिनेश व्यवहारे,सचिन नागपुरे,जितेंद्र कु-हे, अंबादास ईरले, जालिंदर गवळी,पंकज लांभाते,वाकचौरे यांचे स्वीय सहायक बाळासाहेब सोनवणे,इम्रान दारुवाले, रामकृष्ण कांगुणे,राजेंद्र घोरपडे,राहुल देहाडराय,गणेश कोरेकर,निलेश कडू,गणेश शेंडे यांच्यासह महाविकास आघाडी मित्र पक्षाचे पदाधिकारी सदस्य, नेवासा येथील सर्वधर्मीय नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

नेवासा येथील चव्हाण कॉम्प्लेक्स प्रांगणात रॅलीचा समारोप करण्यात आला.यावेळी उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन आमदार शंकरराव गडाख यांच्या हस्ते करण्यात आले.





# आ. किशोर जोरगेवार यांनी घेतली जिल्हा सामान्य रुग्णालयातील कामगारांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 1 मे कामगार दिनानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयातील कामगारांची भेट घेत संवाद साधला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्याच्या सुचनाही उपस्थित अधिका-यांना केल्या आहे.

यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, माया आत्राम, राष्ट्रीय फ्लोरेंस नाइटिंगेल अवार्ड प्राप्त नर्सिंग अध्यापिका पुष्पा पोडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आज महाराष्ट्र दिन आणि कामगार दिना सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात जात येथे रुग्ण सेवा देत असलेल्या कंत्राटी कामगारांची भेट घेतली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांच्या समस्या समजून घेतल्या.

कामगारांशी शिवाय कोणताही विकास शक्य नाही. यातही रुग्णालयात रुग्ण सेवा देत असलेले कामगार हे ईश्वरीय कार्य करत आहे. रुग्णालयात येणा-या व्यक्ती हा दुखात असतो. त्यामुळे आपण अशांसोबत सौजन्यपूर्ण वागुन त्यांच्या चेह-यावर हसु फुलविण्याचे काम आपल्या माध्यमातून अपेक्षित असल्याचे ते यावेळी म्हणाले. येथील सुरक्षा रक्षकांची गार्ड बोर्ड मध्ये नोंद करण्यात यावी, कर्मचा-यांसाठी येथे पाळणाघर तयार करण्यात यावे, कामगारांना नियमित वेतन देण्यात यावे अशा सुचना त्यांनी यावेळी केल्या आहे. रुग्णालय प्रशासनानेही येथील कामगारांशी आदराने वागावे असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी कामगारांना अम्मा का टिफिन भेट स्वरुप दिला. यावेळी कामगार वर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पातोंडा येथे डॉ. आंबेडकर जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदुरा :** भारताचे घटनेचे शिल्पकार महामानव बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती पातोंडा येथे 28 एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संघर्ष क्रीडा मंडळच्या वतीने प्रमुख मार्गाने रथ गावातून तथागत गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दिन दलितांची माता रमाई तैल चित्राची भव्य यात्रा काढण्यात आली यावेळी सरपंच पती सुभाष भाऊ घुळे, उपसरपंच गयाबाई नेमाडे , जिल्हा पुनर्वसन समिती सदस्य पुरुषोत्तम भाऊ झाल्टे, दि न्यू शाळा जळगाव जामोदचे मुख्याध्यापक ज्ञानदेव रणीत, गजानन काळे, नारायण झाल्टे, अशोक पाटील पो. पाटील, यांच्यासह सर्व यांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधी दत्तपूजा करून सादर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी गावातील प्रमुख मार्गवरून हवे मिळून काढण्यात आली सागर मिळून या ठिकाणी उत्साह सादर करण्यात आला. तसेच ज्ञानदेव रणित मुख्याध्यापक निवड झाल्याबद्दल सरपंच पती सुभाष घुळे, पुरुषोत्तम झालटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रज्ञा रणित हि बीए एम एस डॉक्टर पदवी प्राप्त झाल्याबद्दल क्रीडा मंडळ पातोंडा सत्कार करण्यात आला आणि नारायण झाल्टे, सदाशिव घुळे यांनी नींबू पाणी दिले जगदेव रणित यांनी लेझीम पथकाला बक्षीस देऊन सत्कार केला कार्यक्रमाच्या यशस्वी साठी क्रीडा मंडळ पातोंडा अध्यक्ष कपिल शिरसाठ, उपाध्यक्ष मधुकर वाकोडे, शुद्धोधन रणित,दिनकर रणित, कैलास रणित, लक्ष्मण वाकोडे, चंद्रभान रणित,पुनाजी रणित, भास्कर वाकोडे, दादाराव रणीत, देवानंद रणित, अशोक वाकोडे, देविदास रणित, धनराज अंदुकर, भगवान रणित, विजय रणीत, भीमराव रणित, सूत्रसंचलन प्रमोद रणित यानीं केली आभार प्रदर्शन सुनिल रणित यांनी केले यामध्ये सर्व समाज बांधव परिश्रम घेतले. यावेळी नांदुरा ठाणेदार विलास पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल पृथ्वीराज इंगळे, भीमराव वानखडे, विनोद इंगळे यांच्यासह सर्व सहकारी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक शांततेत होण्यासाठी सहकार्य करत होतेण्



# बुलढाणा गोपाळ आश्रम येथे आजपासून बालसंस्कार व ज्ञानप्रबोधन शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथे अ.भा.पंचकृष्ण प्रबोधन परिषद, क्षेत्र जाळीचादेव अध्यक्ष प.पू.आचार्य श्री लोणारकरबाबा महानुभाव अजिंठा रोड गोपाळ आश्रम बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली बालसंस्कार व ज्ञानप्रबोनन शिबीर दि.३ मे ९ मे २०२४ आयोजित करण्यात आले आहे तरी मुले,युवक व पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन ई.श्री.प्रवीणदादा लोणारकरबाबा महानुभाव यांनी केले आहे.स्वावलंबी जीवन विकासाचे खुले शिबीर
3 मे ते 9 मे 2024 स्थळः श्री गोपाळ आश्रम, अजिंठा रोड, बुलडाणा संस्कार शिविरांमुळे विद्यार्थ्यांच्या कोमल हृदयातील कुसंस्कार जावून जीवन विकासाचे संस्कार अंतःकरणात खोलवर रुजतात, मुलांच्या जीवनात कोमलता, माधुर्य, सौंदर्य, तेजस्विता, आस्तिकता निर्माण होते आत्मविश्वासाने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते, मनातील वासना चक्रावर नियंत्रण करून मन एकाग्र होऊन बुद्धिचा विकास घडतो, गुणवत्ता वाढते, अंधश्रद्धेचे निर्मूलन होते. खरी श्रद्धा कशी असते याचा विचार करायला लावणारी दिव्य विचारधारा शिवीरानुन प्राप्त होते. म्हणुन दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शिबीराचे आयोजन प.पू.आचार्य पाथरीकर बाबा महानुभाव यांनी केले आहे. याकरीता मुले. युवक व पुरुषांनी बहुसंख्येने मुलांना घेऊन उपस्थित रहावे.असे आवाहन ई.श्री.प्रवीणदादा लोणारकर यांनी केले आहे.या शिबिरात अहिंसा,मानवतेसाठी करुणा व्यसनमुक्ती सत्य अंधश्रद्धेचे निर्मूलनकर्तव्य स्वावलंबन आत्मबल वाढवणे आरोग्य श्रीमद्‌भगवद्‌गीता ज्ञान आणि विज्ञान,शाकाहार,आदरभाव वासनाचक्रावर नियंत्रण असे बरेच शिकायला मिळते.

# पंतप्रधानाचं कार्यालय वसुलीचं कार्यालय झालंय : आंबेडकर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महाराष्ट्र एक सक्षम राज्य आहे. त्याला कोणाची गरज नाही. ते स्वतःच्या पायावरती उभे राहतात. इथला माणूस कष्टाळू आहे. तो स्वतःच सर्वकाही निर्माण करत असतो. परंतु उरलेले राज्य तसे नाहीत.त्यांना मदत लागते.त्यांना मदत देण्याऐवजी हा सगळा गुजरातमध्ये घेऊन चालला आहे.अहमदाबादचा माणूस मुंबई मध्ये पन्नास मिनिटामध्ये आला पाहिजे.मोदींनी बुलेट ट्रेन उभी केली.४०० किलोमीटरसाठी बुलेट ट्रेन उभी करण्याची किंमत किती तर १ लाख कोटी..! अनेक जणांनी सांगितलं स्पेशल ट्रेन मुंबई अहमदाबाद चालविली तर ती सुद्धा अडीज तासात जाईल.१ लाख कोटीचे जे आपण कर्ज करताय ते उरलेल्या रेल्वे स्टेशन आणि उरलेल्या ठिकाणी रेल्वे पाहिजे त्या ठिकाणी बांधा. पण हा हेकेखोर मोदी आहे.

गुजरातचा असणारा पंतप्रधान, गुजरातमधल्या लोकांना मी अमुक केलय तमुक केलय हे सांगितलं पाहिजे.म्हणून १ लाख कोटीचं कर्ज काढलं आणि आपल्या डोक्यावर बसवलं.२६ रुपयांचं कर्ज ९६ रुपयावर २०२६ ला चाललंय अशी परिस्थिती आहे. कशासाठी? तर एका माणसाच्या इगोसाठी अशी असणारी परिस्थिती आहे.निरव मोदी कोण? तो महाराष्ट्रतला आहे की गुजरातला?

१८ हजार कोटीचं कोकीन सापडलं मुंबईच्या बंदरात सापडलं की पोरबंदरच्या सापडलं? १८ हजार कोटीचा असणारा कोकीन जर हे या देशामध्ये येत असेल तर नवीन पिढीचं काय? आणणारा कोण? अजून सापडलेला नाही.हे सरकार



वसुलीचे सरकार आहे.पंतप्रधानाचं कार्यालय हे मानवतेचं कार्यालय असलं पाहिजे.ते मानवतेचं कार्यालय राहिलेलं नाही.ते वसुलीच झालं आहे.असे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.ते सातारा लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत कदम यांच्या प्रचारार्थ कराड येथे आले असता सभेला संबोधित बोलत होते.यावेळी मंचावर प्रशांत कदम यांच्या सह वंचित बहुजन आघाडीचे राज्य व जिल्हा पातळीवरील पदाधिकारी उपस्थित होते.तसेच सभा ऐकण्यासाठी कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित होता.

प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, राज्यसभेमध्ये चार महिन्यापूर्वी एका प्रश्नाना उत्तर देण्यात आलं.तो प्रश्न असा होता की २०१४ पासून या देशामध्ये किती नागरिकांनी देश सोडला व त्याच्याच बरोबर नागरिकत्व सोडलं. त्याची आकडेवारी द्या.सरकार उत्तर देतंय की १७ लाख कुटूंब अशी आहेत की २०१४ पासून ते प्रश्न विचारपर्यंत या देशाच नागरिकत्व सोडलं.ह्या देशाला ही सोडलं अशी परिस्थिती आहे.जे सरकार म्हणतय की आम्ही हिंदू राष्ट्र करायला निघालोय.ते १७ लाख कुटूंब गेलेले मुसलमान नाहीत,ख्रिश्चन नाहीत, ते १७ लाख कुटूंब सर्वच्या सर्व हिंदू आहेत.त्यांची मालमत्ता कमीत कमी ५० कोटी आहे.भारतीय जनता पार्टीला माझे आवाहन आहे की दिलेली आकडेवारी खोटी आहे.हे सांगा.त्याच दिवशी तुम्हाला चॅलेंज देतो.या ठिकाणी तुम्ही या,आणि तुम्हाला राज्यसभेच्या प्रश्नांना प्रश्न क्रमांक १ कुठल्यादिवशी गेला? आणि कुठल्या मंत्र्यांनी दिला? हे ही मी तुम्हाला सांगतो.माझी आकडेवारी नाही.ही सरकारी आकडेवारी आहे. राज्यसभेच्या रेकॉर्ड वर ठेवलेली आकडेवारी आहे.ते १७ लाख कुटूंब गेले का? त्याचे उत्तर तुम्ही अमित शहाची मुलाखत इलेक्ट्रॉल बॉण्डच्या संदर्भात बघितली.तर तो असा म्हणतोय २० लाख जमले,प्रत्यक्षात २० लाख नाही १२ लाख जमले.त्या १२ लाखा पैकी बीजेपीच्या तिजोरीत गेले.हे जे कुटूंब सोडून गेलेत.त्यांना सातत्याने तगादा होता एकतर बॉण्ड विकत घ्या.आणि आम्हाला असणारं मदत करा.ते म्हणत होते आम्ही असणारं कायदेशीर जगतोय. सरकारचे असलेले टॅक्सेस भरतोय. आमच्या कडे जास्ती पैसे नाहीत आम्ही बॉण्ड देऊ शकत नाही.तुम्ही बॉण्ड देऊ शकत नाही तर आम्ही तुमच्यावर ईडी,इन कम टॅक्स,सीबीआयचा वापर करतो.ही सगळी कुटूंब निष्ठावान होती, समाजामध्ये असलेली त्यांची इभ्रत होती. समाज असलेला त्यांना मानत होता. त्यांना असं वाटलं जर आपण ह्यांना पैसे नाही दिले तर हे आपल्यावर धाडी टाकतील. आपल्या इज्जतीचं खोबरं करतील,आपल्या बाप जाद्याने कमविलेल्या इज्जतीचं खोबरं होऊ नये. म्हणून ते देश सोडून गेले, असे सुद्धा त्यांनी सांगितले.

# मित्राच्या लग्नाला गेलेले मेहकरचे तरुण ठार

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** 2 मे ला मित्राच्या लग्नाला गेलेल्या तरुणांच्या गाडीला अपघात होऊन यात मेहकर येथील २ तरुण जागीच ठार झाले असून ३ जण जखमी झाले आहेत, जखमींना अकोला येथे उपचारार्थ हलविण्यात आले आहे. याबाबत असे की मेहकर येथील संतोषी माता मंदिर परिसरात राहणाऱ्या धनंजय देशमुख यांचे लग्न मानोरा जिल्हा वाशीम येथे होते. या लग्नाला त्याचे मित्र आपल्या खासगी चार चाकी गाडी क्र. एम. एच. २० ईजे ८०४४ ने मानोरा गेले असताना समोरून येणाऱ्या वाहनांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात अंकित खडसे (वय २८) आणि निखिल शेळके (वय २९) या दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी सायंकाळी मानोरा मंगरुळपिर रस्त्यावर कोळंबी फाट्यानजीक घडली. सदर अपघातात केनवड ता रिसोड जि वाशीम येथील शुभम विजय गोळे याच्या डोक्याला उजव्या बाजूने मार लागलेला आहे तर मेहकर येथील प्रशांत कैलास रहाटे व डोंणगाव ता. मेहकर येथील निखिल राजेश बाजड हे किरकोळ जखमी झालेले आहेत. ह्या अपघातात मेहकर येथील २ तरुणांचा मृत्यू झाल्याने मेहकर शहरावर शोककळा पसरली आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# अडीच हजार मुलींचे संसार उभा करणारा देव माणूस प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईनाथांनी दिलेल्या श्रद्धा-सबुरी व सबका



मालिक एकच्या संदेशाने शिर्डी जगविख्यात पावली आहे. बाबांच्या शिर्डीची महती टिकवून ठेवण्याची तसेच साई चरित्राच्या शिकवणीप्रमाणे काम करण्याची जबाबदारी प्रत्येक शिर्डीकरांची आहे. हे वाक्य वाचायला जितकं सोपं तितकच कृतीत उतरवायला अवघड. परंतु जे बाबांचे निस्सिम भक्त असतात ते कितीही अडचणी आल्या तरी बाबांनी दाखवलेल्या तत्त्वज्ञानाच्या रस्त्याने चालत राहतात. असंच व्यक्तिमत्व म्हणजे साईभक्त, साईभूषण, शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते हे गेल्या २४ वर्षापासून सामुदायिक विवाह सोहळ्याचा उपक्रम राबवितात आहे. सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून आजपर्यंत एक नाही दोन नाही तब्बल अडीच हजार मुलींचे विवाह आणि त्यांचे सुखी संसार उभारत बापू खऱ्या अर्थाने बाप माणूस ठरले आहेत. आज समाजात मुलींची संख्या कमी झाली तरी लग्न जमत तेव्हा खर्चाचा भार सर्वाधिक मुलीच्या बापावरच असतो. अशा परिस्थितीत अनेक बाप कर्जबाजारी होऊन, शेती विकून मुलीचे लग्न करतात. ज्यांना या दोन्ही गोष्टी जमत नाही ते मृत्यूला कवटळतात. समाजाचे हे वास्तव लक्षात घेत बापूंनी सामुदायिक विवाह सोहळ्याला चळवळ बनवत अनेक गोरगरीब बापांना कर्जबाजारी होण्यापासून, आत्महत्या करण्यापासून वाचविले आहे. कर्जबाजारी होऊनही बाप जितक्या धुमधडाक्यात मुलीचे लग्न लावू शकणार नाही त्यापेक्षा मोठ्या धुमधडाक्यात बापू दरवर्षी अनेक मुलींचे विवाह सामुदायिक विवाह सोहळ्यात लावून देतात. विवाह सोहळ्याच्या आदल्या दिवशी ग्रामस्थांना मांडव डहाळे जेवण, दुसऱ्या दिवशी मिष्ट्रान भोजन, सवाद्य मिरवणूक, फटाक्यांची आतिशबाजी, आकर्षक विद्युत रोषणाई, संत महंतांचे आशीर्वाद अजून काय पाहिजे मुला-मुलींच्या आई बापाला. हा सोहळा जेव्हा सुरू होतो तेव्हा मुलींच्या बापांचे डोळे आनंदाने भरून जातात. तेव्हा पानावलेल्या डोळ्यांनी ते एकच म्हणत असतील, देव आम्ही पाहिला नाही पण बापूंपेक्षा तो नक्कीच वेगळा असणार नाही. परमेश्वराने मुलगी दिली नाही म्हणून रडत बसण्यापेक्षा सामुदायिक विवाह सोहळा व्रत म्हणून पार पाडणाऱ्या बापूंना आज हजारो मुलींचे वडील होण्याचे भाग्य लाभले आहे. या उपक्रमास महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा भक्कम पाठिंबा मिळाला. बापूंची अर्धांगिनी सुमित्रा कोते काकींना तर सामुदायिक विवाह सोहळ्यातल्या लेकी सासरी जाईपर्यंत एक मिनिटाची देखील ऊसत नसते. बापु व काकीं बरोबर शिर्डी ग्रामस्थ देखील घरातील लग्न सोहळा असावा अशा पद्धतीने झटत असतात. अंगावर पडेल ती जबाबदारी उचलतात.हा विवाह सोहळा देखणा, नीटनेटका कसा होईल यासाठी प्रयत्न करतात. बापू देखील विवाह सोहळ्याच्या यशस्वी नियोजनाचे श्रेय शिर्डी ग्रामस्थ, साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सदस्य, साईभक्त, नामदार विखे यांचे सहकार्य या सर्वांना मोठ्या मनाने देतात. या आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याची महाराष्ट्रात नव्हे देश-विदेशात दखल घेतली गेली आहे.गिनीज बुकातील नोंदसह अनेक पुरस्काराही या उपक्रमास मिळाले आहेत. या विवाह सोहळ्यापासून स्फूर्ती घेऊन अनेक ठिकाणी सोहळे सुरू झाले आहेत. जनसेवेचा हा यज्ञ २४ वर्षापासून अथक सुरू आहे. या उपक्रमाबद्दल बोलताना साईंच्या आशीर्वादामुळे आणि आई-वडिलांच्या संस्कारामुळे हे काम करू शकलो, असे बापू नम्रपणे सांगतात.



आपण जगलो ते संस्कारामुळे .पुढची पिढी घडवायची असेल तर विचार-संस्कार गरजेचा . म्हणून विवाह सोहळ्यात सर्व वधू-वरांना आपल्या आई-वडिलांना श्रावण बाळाप्रमाणे जपण्याची शपथ ते देतात . एवढ्यावरच थांबतील ते बापू कसले ? स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी मुलीच्या जन्माच्या स्वागतासाठी वधू-वरांना ११ हजार रुपये जाहीर दिले जातात . **पंकज लोढा,**



## ग्रामीण भागातील दक्षता समित्या 'कागदावर'च

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात काही गावात रेशन धान्य, पुरवठा पारदर्शक व्हावा, सार्वजनिक वितरण प्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकास्तरीय, ग्रामीण पातळीवर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. तर काही गावात दहा वर्षे पासून दक्षता समितीची नेमणूक झाली नाही सावळदबारा येथे शुद्धा दहा वर्षे पासून दक्षता समिती स्थापन करण्यात आली नाही.परंतु केवळ मासिक बैठकीला हजेरी लावण्यापर्यंतच या समित्यांचे कार्य मर्यादीत झाल्याने अनेक समित्या केवळ 'कागदा'वरच असल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात पाहावयास मिळत असल्याची माहिती अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागिय सरचिटणीस गोकुळसिंग राजपूत, तालुका अध्यक्ष विजय काळे, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप देशमुख, संदीप राजपुत,तालुका उपाध्यक्ष सुनील चोरमारे यांच्या निदर्शनास आल्याचे दिसून आले आहे.सार्वजनिक वितरण प्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकास्तरीय, ग्रामीण पातळीवर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या. परंतु केवळ मासिक बैठकीला हजेरी लावण्यापर्यंतच या समित्यांचे कार्य मर्यादीत झाल्याने अनेक समित्या केवळ 'कागदा'वरच आहे तर काही गावात समिती स्थापन करण्यात आली नाही असल्याचे चित्र सोयगाव तालुक्यात पाहावयास मिळत आहे.

सार्वजनिक वितरण प्रणालीवर अंकुश राहावा, वितरण प्रणाली पारदर्शक व्हावी, ग्राहकांच्या तक्रारीचा निपटारा व्हावा यासाठी तालुकास्तरीय दक्षता समिती गठीत करण्यात येते. याप्रमाणेच गावपातळीवरही दक्षता समितीचे गठण केले जाते. सोयगाव तालुक्यात होणारा धान्य पुरवठा खरोखरच गोरगरीब जनतेपर्यंत पोहचतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी या समितीची आहे. परंतू, नियमित तपासणीच केली जात नाही. इ-पॉश मशीनवर वृध्द, गोरगरीब जनतेचे ठसे उमटत नाहीत, तक्रारी करूनही न्याय मिळत नसल्याचे या लाभार्थींचे म्हणणे आहे. या तक्रारीकडेही समितीचे लक्ष नसल्याचे दिसून येते. काही गादक रोजगाराच्या कामानिमित्त बाहेरगावी गेले आहेत त्यांच्या नावावर येणाऱ्या धान्याची उचल कशी होते आदी बाबींकडे स्थानिक दक्षता समितीने प्रत्यक्ष स्थानिक रेशन वितरकांकडे भेटी देणे आवश्यक आहे. शिवाय रेशन धान्य दुकानदाराने आपल्या दुकानाच्या दर्शनी भागास फलक लावणे आवश्यक आहे. दर फलक लावताना किती मालाची उचल झाली, किती माल शिल्लक आहे, त्या मालाचे शासकीय दर किती आहे व ग्राहकांना तो माल शासकीय दरात विकल्या जातो का, दुकानात तक्रारी नोंद वही ठेवण्यात आली आहे का आदी बाबींची पडताळणीही दक्षता समितीला करावी लागते.परंतु काही गावात दक्षता समितीच नाही. याकडे पुरवठा अधिकारी सोयगाव यांनी तातडीने लक्ष देऊन ज्या गावात दक्षता समिती नेमली नाही तेथे समिती स्थापन करण्यात यावी.अशी मागणी संघटनेच्या वतीने गोकुळसिग राजपूत यांनी केली आहे.सोयगाव तालुक्यातील अनेक रेशन दुकानांत दर्शनी भागात दरपत्रक लावले नाहीत. यावरून दक्षता समित्या केवळ मासीक बैठकीपुरत्या मर्यादीत उरल्याचा आरोप लाभार्थीमधून होत आहे. दक्षता समित्याची मासीक बैठक दर महिन्याला होत असते. परंतू, या बैठकीत घेतलेल्या ठरावाची अंमलबजावणी फारशी होत नाही अशी ओरड ग्रामीण भागातुन होत आहे. ग्रामीण भागात स्थानिक रेशन दुकानदार, रेशन दुकान यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता समिती गठीत आहे. त्या समितीचे अध्यक्ष सरपंच असतात तर ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व ग्रा.पं. सदस्य त्या समितीचे सदस्य आहेत. परंतु या समित्या केवळ कागदावरच पाहावयास मिळतात. ग्रामीण भागातील समित्यांना आपल्या अधिकाराची जणू जाणीवच नाही, असा आरोप गोकुळसिंग राजपूत, तालुका अध्यक्ष विजय काळे यांनी केला आहे.तालुका दक्षता समितीच्या बैठका नियमित होतात. बैठकी दरम्यान वितरण प्रणाली पारदर्शक व्हावी. यासाठी विविध ठराव घेतले जातात.तरीशुद्धा कुठे ग्राहकांची अडवणूक होत असेल तर त्यांनी दक्षता समितीकडे तक्रारी कराव्यात परंतु सावळदबारासह काही गावात दक्षता समिती स्थापन नाही तर तक्रारी कोणाकडे करायाची अशा प्रश्न रेशनकार्ड धारकांना पडला आहे.याकडे सोयगाव पुरवठा अधिकारी लक्ष देतील का? अशा प्रश्न रेशनकार्ड धारकांनी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे पदाधिकारी गोकुळसिंग राजपूत, दिलीप देशमुख,विजय काळे, संदीप राजपुत, सुनील चोरमारे याच्याशी केला आहे.

## गिरगावमध्ये सायकलवरून झालेल्या वादातून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सायकल काढण्यावरून झालेल्या वादातून पिता-पुत्राने केलेल्या मारहाणीत ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना गिरगाव येथे घडली. याप्रकरणी व्ही. पी. रोड पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पिता-पुत्राला अटक करण्यात आली आहे.

गिरगाव येथील मुगभाट लेनमधील पारिजात सदन परिसरात ही घटना घडली. मृत मुकेश मोरजकर (५५) यांचा मुलगा इमारतीच्या खालीच सायकल उभी करतो. त्यावरून झालेल्या वादातून विपुल राऊत (३२) व विकास राऊत (६२) यांनी मोरजकर यांना लाथा-बुक्क्याने मारहाण केली. तसेच त्यांचे डोके भींतीवर आपटले, असे तक्रारीत म्हटले आहे. या मारहाणीनंतर मोरजकर खाली कोसळले. त्यांना तत्काळ जीटी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी अपमृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र मोरजकर यांची पत्नी मोहिनी मोरजकर यांनी व्ही. पी. रोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आणि राऊत पिता-पुत्राने पतीला मारहाण केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी याप्रकरणी विकास व विपुल या दोघांना गुरुवारी मध्यरात्री राहत्या घरातून अटक केली.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

## मेळघाटात भीषण पाणीटंचाई, सात गावांमध्ये टँकर

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मेळघाटातील धारणी व चिखलदरा हा या दोन्ही तालुक्यांत पाणीटंचाई तीव्र झाली आहे. आदिवासी वस्त्या तहानेने व्याकुळ झाल्या आहेत. रात्रीबेरात्री पाण्यासाठी आदिवासी बांधवांची भटकंती सुरू आहे. सध्या सात गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. मेळघाटातील बेला, मोथा, खडीमल, धरमडोह, आकी, बहाद्दरपूर आणि गौलखेडा बाजार तसेच चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगी मग्रापूर या गावांध्ये अकरा टँकरच्या सहाय्याने पिण्याचे पाणी पुरविण्यात येत आहे. या गावांध्ये जलजीवन मिशनची कामे अपूर्णावस्थेत असल्याने तात्पुरती उपाययोजना म्हणून टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. मेळघाट हा डोंगरदऱ्यांचा भाग असून पावसाचे पाणी उतारावरून वाहून जाते. या पाण्याचा फायदा जिल्ह्यातील इतर भागांना होतो. पण मेळघाटातील छोटे पाडे, वस्त्या, ढाणा तहानलेलेच राहतात. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न डोके वर काढतो; आणि पाऊस आला की हा प्रश्न पुन्हा दुसऱ्याच वर्षी चर्चेला येतो. गेल्या दोन दशकांपासून हेच सुरू आहे. परंतु, कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप करण्यात आलेल्या नाहीत. जलसंधारणाच्या नावावर मेळघाटात मोठ्या प्रमाणात कामे हाती घेतली जातात; परंतु प्रत्यक्षात पाण्याचा साठा होताना दिसत नाही.